शनिवार, ७ ऑक्टोबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ६५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 7 OCT. 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-03 ●ISSUE-65 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# मूलभूत सुविधा पुरवणे हे सरकारचे काम

## उच्च न्यायालयाने खडसावले : रिक्त पदे भरण्यासाठी काय पावले उचलली?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सरकारी रुग्णालयांत सध्या क्षमतेपेक्षा अधिक रुग्ण दाखल होत असल्याने शासकीय वैद्यकीय सेवेवर सध्या ताण आहे, असे सांगून राज्य सरकार आपली जबाबदारी झटकू शकत नाही. नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, या शब्दांत नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरमधील सरकारी रुग्णालयांत घडलेल्या मृत्यू तांडवावरून मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सुनावले. तसेच सरकारी डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी काय पावले उचलली? याची माहितीही प्रतिज्ञापत्राद्वारे देण्याचे निर्देश देत हायकोर्टाने पुढील सुनावणी 30 ऑक्टोबरपर्यंत तहकूब केली.



वैद्यकीय महाविद्यालयांशी जोडलेल्या सरकारी रुग्णालयांचे प्राथमिक कर्तव्य हे विद्यार्थ्यांना शिकवणे व संशोधन करणे आहे. त्यानंतर तिथे येणाऱ्या रुग्णांची काळजी घेणे त्यांच्याकडून अपेक्षित आहे. मात्र, या रुग्णालयांवरही रुग्णांची काळजी घेण्याची जबाबदारी वाढत असल्याने या स्थितीत वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डॉक्टरांच्या 50 टक्क्यांहून अधिक जागा रिक्त असणे स्वीकाहार्य नाही, असे परखड मत यावेळी हायकोर्टाने व्यक्त केले. नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात काही दिवसांपूर्वी झालेल्या रुग्णांच्या सलग मृत्यूंबावत मुंबई उच्च न्यायालयाने एका पत्राची दखल सुमोटो जनहित याचिका दाखल केली आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय व न्यायमूर्ती अरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली. या सुनावणीत राज्याचे महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी हायकोर्टाला सांगितले की, अनेक रुग्ण आधीच अत्यावस्थ परिस्थितीत रुग्णालयात आले होते. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. परंतु दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या परिस्थितीसाठी कुणा एकाला जबाबदार धरता येणार नाही. आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी ज्या उपाययोजना तातडीने आवश्यक आहेत, त्या सुधारणा करण्यास राज्य सरकार तयार आहे. येत्या महिन्याभरात वैद्यकीय सेवेतील हजारो रिक्त पद महिन्याभरात भरतील. त्या दिशेने राज्य सरकार पाऊल उचलत आहे, मुख्यमंत्री स्वतः जातीने यावर लक्ष ठेवून आहेत,




असे सांगत सराफ यांनी नांदेड शासकीय रुग्णालयातील मृत्यूंसदर्भात चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीचा अहवाल न्यायालयात सादर केला.
गेल्या वर्षभरात नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयांनी मागितला औषधांचा साठा आणि त्यापैकी किती औषधे पुरविण्यात आली, याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी माहिती द्यावी, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येत असलेल्या रुग्णालयांसाठी डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची मंजुर केलेली पदे, त्यापैकी भरलेली पदे आणि रिक्त पदे... रिक्त पदे भरण्यासाठी सरकारने उचलली पावले, यासंदर्भात दोन्ही विभागाच्या सचिवांनी माहिती द्यावी.

# राष्ट्रवादी कुणाची? फैसला सोमवारी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवारांनी बंड केल्याने फुट पडली आहे. त्यांचे हे प्रकरण केंद्रीय निवडणूक आयोगाकडे गेले असून याप्रकरणी आज सुनावणी झाली. या सुनावणीवेळी खुद्द शरद पवार निवडणूक आयोगात उपस्थित होते. दोन तास ही सुनावणी चालली. सुनावणी झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार गटाकडून खोटी कागदपत्रे सादर करण्यात आली असून त्यांनी काल्पनिक वाद निर्माण केला असल्याचा दावाही सिंघवी यांनी केला आहे. शुक्रवारी दोन तास सुनावणी झाल्यानंतर आता पुढची सुनावणी सोमवारी होणार आहे. सोमवारी सायंकाळी ४ वाजता सुनावणी होणार आहे.

अभिषेक सिंघवी म्हणाले की, आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगासमोर दोन मुद्दे उपस्थित केले. पहिलं म्हणजे आमची बाजू ऐकून न घेता पक्षात वाद असल्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय चुकीचा असू शकतो. त्यामुळे आधी आमची बाजू ऐकून घ्या आणि मगच निर्णय जाहीर करा, असे निवडणूक आयोगाला सांगितले आहे. दुसरा मुद्दा नैसर्गिक न्यायाचा उपस्थित करण्यात आला आहे. आम्ही रिस्पॉंडंट आहोत. त्यामुळे आम्ही उत्तर देणार आहोत, असेही सिंघवी म्हणाले.

**आमचीही बाजू ऐकून घेणार :** निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, आमचा हा विरोध प्राथमिक रुपात मानता येणार नाही. परंतु, आम्हाला आश्वस्त केले आहे की याचिकाकर्त्याचा युक्तीवाद झाल्यानंतर आमचे म्हणणे ऐकले जाईल. त्यानंतर निवडणूक आयोग अंतिम निर्णय घेईल, अशीही माहिती त्यांनी दिली.
**काल्पनिक वाद निर्माण केला :** कोणताही व्यक्ती, खोटे कागदपत्र सादर करून हे नाही सांगू शकत की वाद आहेत. काल्पनिक वाद निर्माण करून दोन गट दाखवू शकत नाही. काल्पनिक वादासंदर्भात आम्ही युक्तीवाद करू शकतो. हा मुद्दा प्राथमिक रुपात ठेवला आहे. नंतर आम्ही विस्ताराने हा मुद्दा मांडणार आहोत, असेही ते म्हणाले.
**अजित पवार गटाचा युक्तीवाद काय? :** विधानसभेचे ४२ आमदार, विधानपरिषदेचे ६ आमदार, नागालँडमधील ७ आमदार, लोकसभा आणि राज्यसभेचे प्रत्येकी एक खासदार अजित पवाग गटाकडे आहेत. अजित पवार यांची ३० जूनला बहुमतानं अध्यक्षपदी निवड झाली. पक्षाचे मुख्य प्रतोद अनिल पाटील आमच्याबरोबर आहेत. विधानसभा, विधानपरिषदेचे अधिक संख्याबळ आमच्याकडे आहे. कोअर कमिटीतील सदस्यही आमच्याबरोबर आहेत. अनेक वर्षापासून पक्षांतर्गत निवडणुका झाल्या नाहीत, असा युक्तीवाद अजित पवार गटाने केला आहे.

# खुशखबर... स्टेट बँक ऑफ इंडियात होणार मेगा भरती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्टेट बँक ऑफ इंडिया अंतर्गत ऑफिसर पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवार या पदांच्या भरतीसाठी अर्ज करू शकतात. अर्ज करण्याच्या पायऱ्यांविषयी माहिती अधिकृत वेबसाइटवर देण्यात आली आहे. शिवाय, उमेदवारांनी सूचना वाचल्यानंतरच अर्ज करण्याच्या सूचना एसबीआयच्यावतीने देण्यात आल्या आहेत.

एसबीसी स्पेशालिस्ट ऑफिसर भरती २०२३ ची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून, भरतीअंतर्गत ४३९ पदांवर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. भरतीद्वारे व्हाइस प्रेसिडेंट, असिस्टंट जनरल मॅनेजर अशा विविध पदांसाठी भरती करण्यात आली आहे. १६ सप्टेंबर २०२३ पासून या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज भरले जात आहेत. ज्या उमेदवारांनी अद्याप भरतीसाठी अर्ज केलेला नाही त्यांना अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज करण्याचा सल्ला एसबीआयच्या वतीने देण्यात आला आहे. कारण त्यानंतर कोणत्याही उमेदवाराचा फॉर्म स्वीकारला जाणार नाही. उमेदवारांना सूचना वाचल्यानंतरच अर्ज करण्याचा सल्ला दिला जातो. कारण चुकीचा भरलेला फॉर्म एसबीआय स्वीकारणार नाही. सामान्य, ओबीसी आणि ईडब्ल्यूएस श्रेणींसाठी अर्ज शुल्क ७५० रुपये ठेवण्यात आले आहे. तर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, पीडब्लूडीसाठी अर्ज विनामूल्य ठेवण्यात आले आहेत. शुल्काचा भरणा फक्त ऑनलाइन स्वीकारला जाईल.

# फर्दापुरात १ लाख भाविकांनी घेतले पादुकांचे दर्शन

## अजिंठ्याच्या लेणींच्या पायथ्याशी गर्दीचा महापूर


आधुनिक केसरी न्यूज

गोकुळसिंग राजपूत

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे चरण तुझे गुरुराया हीच माझी देवपूजा ही श्रध्दा मनात ठेवून गुरुवार श्री स्वामी जगद्गुरू नरेंद्र चार्य महाराज यांच्या सिध्द पादुकांचे दर्शन सोहळ्यात एक लाख भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी आठ हजार भक्तगणांनी उपासक दीक्षा घेवून गुरुपूजन केले. फर्दापूरच्या ठाणा शिवारात अजिंठ्याच्या लेणींच्या पायथ्याशी हा एक दिवसीय सोहळा आयोजित करण्यात आला होता. दरम्यान पहाटे आठ वाजता सिध्द पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर संतपीठावर पादुका विराजमान करण्यात आल्या. यावेळी गुरुपुजन करुन जनम प्रवचन कार दिलीप कुमार सोमदे यांनी प्रवचन करून भाविकांना मंत्रामुग्ध केले. यावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे माजी आमदार सांडू पाटील बनकर, प्रभाकर पालोदकर, मंत्री अब्दुल सत्तार यांचे बंधू जावेद शेख भाजपचे सुरेश बनकर ज्ञानेश्वर मोठे सुनील मिरकार नगरसेवक राजू दुतोंडे बबलू शेख बंडू काळे सरपंच जाकीर भाई सदस्य योगेश शिंदे राहुल दामोदर आदींच्या हस्ते सामाजिक उपक्रमांअंतर्गत दुर्बल घटक पुनर्वसन अंतर्गत, ४८ गरजू महिलांना संस्थांनच्या वतीने मोफत आधुनिक पीठ गिरणी वितरण करण्यात आली. यावेळी मराठवाडा उपपीठ प्रमुख गणेश मोरे, सुभाष जोजारे, मधुकर खैरे, जिल्हा निरीक्षक संदीप थोरात, साहेबराव आहेर, तालुकाध्यक्ष संतोष झोड, विकास जैवळ आदींनी या उपक्रमात पुढाकार घेतला. दरम्यान नरेंद्र चार्य संस्थांच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची चित्रफीत दाखविण्यात आली. या दर्शन सोहळ्यात आठ हजार भक्त गणांनी उपासक दीक्षा घेतली. गुरुपूजेचा मान छत्रपती संभाजीनगर येथील ज्ञानेश्वर जाधव व शोभा जाधव या दाम्पत्याना मिळाला. दरम्यान या दर्शन सोहळ्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक भरत मोरे यांच्या नेतृत्वाखाली दंगा काबू पथक सोयगाव अजिंठा फर्दापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी मैदानात तैनात करण्यात आले होते.



सिद्ध पादुका दर्शन सोहळा साठी एक लाख भाविकांनी हजेरी लावली होती. त्यामुळे रात्री उशीरापर्यंत दर्शन सोहळा सुरूच होता. एक लाख भाविकांना बुंदीचा महाप्रसाद देण्यात आला होता. त्यामुळे या बुंदीचा महाप्रसाद चा भाविकांनी लाभ घेतला सोयगाव सिल्लोड आणि कन्नड आगरातून भाविकांना विशेष जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या. यावेळी हेमंत पाटील, उत्तम गवळे, साईदास पवार, नंदू महाजन, अजय राठोड, अमोल उबाळे आदींनी महाप्रसादसाठी पुढाकार घेतला होता.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


# होय, मला शिक्षक व्हायचं

काही सन्माननीय अपवादही असतातच पण आज मात्र सगळीकडे असेच दृश्य पाहायला मिळते हे मात्र खरे !

या गोष्टीला दुसरी एक बाजूही आहे. काही लोक असेही म्हणतील की शिक्षक तरी पूर्वीसारखे आपल्या ज्ञानदानाचे काम समर्पित भावनेने कुठे करतात ? तेही आपला स्वाभिमान विसरून संस्थाचालक, राजकारण्यांची हाजी हाजी करण्यात धन्यता मानतात. मग त्यांच्या या अधोगतीला जबाबदार कोण ? हा युक्तिवाद बरोबर वाटत असला तरी टाळी कधीच एका हाताने वाजत नाही. अशी परिस्थिती त्यांच्यावर का आली याचाही विचार व्हायला हवा. तरी अशाही परिस्थितीत अनेक शिक्षक बंधू भगिनी आजही समर्पित भावनेने काम करीत आहेतच हेही तितकेच खरे.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ राधाकृष्णन, डॉ ए पी जे अब्दुल कलाम हे आधी आणि नंतरही शिक्षक होते. विद्यार्थ्यांमध्ये रमायला त्यांना अतिशय आवडत असे. हजारो लाखो विद्यार्थ्यांचे ते आदर्श होते. डॉ कलाम जेव्हा राष्ट्रपती झाले, तेव्हा त्यांना आपल्या शिक्षकांची आठवण आली. आपल्या शपथ समारंभाच्या वेळी आपल्या शिक्षकांना त्यांनी अतिशय सन्मानाने आमंत्रित केले. त्या त्यांच्या गुरूंना अशा प्रसंगी किती धन्यता वाटली असेल ! संदीप वासलेकर यांनी त्यांच्या एका लेखात मागे एक प्रसंग सांगितला होता. युरोपात स्वीडन आणि डेन्मार्क या देशांच्या सीमेवर लुंड विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ आपले ज्ञानदानाचे कार्य गेल्या पाचशे वर्षांपासून करीत आहे. काळाच्या ओघात काळाला अनुकूल असे अनेक बदल या विद्यापीठाने आपल्या शिक्षण पद्धतीत केले आहेत. या विद्यापीठातर्फे एक नियतकालिक चालवलं जात. ते विद्यार्थीच चालवतात. पण त्याचा दर्जा आंतरराष्ट्रीय आहे. सकाळ पेपरमध्ये यावर एक लेख आला होता. संदीप वासलेकर यांनी तिथे जाऊन त्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली. तिथे एक विद्यार्थिनी त्यांना भेटली. त्या विद्यार्थिनीचे आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, साहित्य इ क्षेत्रातील ज्ञान पाहून ते प्रभावित झाले. ती अत्यंत बुद्धिमान अशी असलेली विद्यार्थिनी नॉर्वेची नागरिक होती व लुंड विद्यापीठात शिक्षण घेत होती. त्यांनी तिला विचारले की पदवी नंतर काय पुढे काय करण्याची इच्छा आहे ? त्या प्रसंगी त्या दोघांमधील झालेला संवाद त्यांच्याच शब्दांत- ती म्हणाली, ''माझी महत्त्वाकांक्षा खूप मोठी आहे;





## आनंदी पहाट

# स्वावलंबित्व अर्थव्यवस्थेवर अवलंबून

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ख्रिस्त पूर्व काळानंतर विकसित झालेल्या सिंधू खोऱ्यातील सभ्यतेमध्ये प्रगत आणि भरभराटीची आर्थिक व्यवस्था होती. सिंधू खोऱ्यातील लोक शेती, पाळीव प्राणी, तांबे, कांस्य आणि कथील यापासून अवजारे आणि शस्त्रे बनवत तसेच मध्यपूर्वेतील काही देशांशी व्यापारही करत. वैदिक युगात शेती ही लोकांची मुख्य आर्थिक क्रिया होती, परंतु दुसऱ्या शहरीकरणामुळे उत्तर भारतात अनेक शहरी केंद्रे वाढली, त्यामुळे व्यापाराला मोठी चालना मिळाली. प्राचीन भारतीयांचे मध्य पूर्व, रोमन साम्राज्य आणि दक्षिण पूर्व आशियासारख्या दूरच्या देशांशी व्यापारी संपर्क होते. अनेक भारतीय व्यापारी वसाहती इतर देशांमध्ये स्थायिक झाल्या. बहुतेक भारतीय लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते आणि खेड्यातील अर्थव्यवस्था स्वावलंबी होती. शेती हा लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय होता आणि गावाच्या अन्नाची गरज भागवत असे. तसेच कापड, अन्न प्रक्रिया आणि हस्तकला यासारख्या उद्योगांसाठी कच्चा माल उपलब्ध करून दिला जात असे. शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर वर्गातील लोक न्हावी, सुतार, डॉक्टर, सोनार, विणकर इत्यादी देखील व्यवसाय करत असत. शहरे आणि शहरी केंद्रांमध्ये नाण्यांद्वारे व्यापार होत असे, परंतु खेड्यांमध्ये वस्तुविनिमय ही आर्थिक क्रियाकलापांची मुख्य व्यवस्था होती. जाती आणि पोटजातींच्या व्यवस्थेने कामगारांचे विभाजन सुनिश्चित केले आणि शिक्षकांना प्रशिक्षण प्रदान करून संघाप्रमाणे कार्य केले. जातिव्यवस्थेने लोकांना व्यवसाय बदलण्यापासून आणि उच्च जातीच्या जीवनशैलीची आकांक्षा बाळगण्यापासून प्रतिबंधित केले. पारंपारिकपणे, संयुक्त कुटुंब पद्धती होती आणि कुटुंबातील सदस्यांनी व्यवसाय उपक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी त्यांची संसाधने एकत्र केली.



आधुनिक केसरी

**धरिता चरण | विठु तुझे ||**

आता कुठे थोडे | कळु लागे मना ||
अंतरीच्या खुणा | दिसु लागे ||१||
भाव बीज रूजे | कर्म वृक्ष फुले ||
फल रूप झाले | भक्तीमय ||२||
पूर्वपुण्याईने | गवसली वाट ||
चैतन्य पहाट | निरंतर ||३||
होता घंटारव | मनाच्या गाभारी ||
अभंग ही वारी | श्वास झाला ||४||
भाग्यवंत ऐसा | झालो रे पावन ||
धरिता चरण | विठु तुझे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

योगक्षेमं वहन्तीं त्वां दयारूपां जयप्रदाम्|
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| १०५ || (माझ्या) योगक्षेमाचे निर्वहन करणाऱ्या तुला, दयारूपेला, जय प्रदान करणाऱ्या दुर्गा देवीला दारिद्र्यदुःखाचा नाश करण्यासाठी मी नमस्कार करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सद्गुरु सन्त अनादि हैं,
सब गुरु पर गुरु पार ।
आप ज्ञान संसार में, केवल आप अधार
।।७३।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/७३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सन्त सद्गुरू सर्व गुरूंचे गुरू जगद्गुरू आहेत. त्यांच्या द्वारेच जगात प्रथम ब्रह्मविद्या प्रगट होते. तेच ब्रह्मविद्येचा एकमात्र आधार आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आणि हे तर आदर्श जगण्याचे सारे आहे. एक म्हणतो आपल्या आचार धर्मानुसार वागावे अंतकाळी परमेश्वर नाम घ्यावे.एक म्हणतो सतत सत्कर्म करत रहावे, सतत भगवंताची प्राप्ती करून घेतली तर शेवटच्या क्षणी तो आपला आधार असतो. नाही तर शेवटच्या क्षणी भ्रम होतो.त्याच्या तोंडांत भगवंताचे नाव येतं नाही. एक म्हणतो की जीवन सार्थकी लावायचे सन्मार्गावर जगावे पापाची वासना कधीच करू नये,जमेल तेव्हा जमेल तशी समाजसेवा करावी,तीर्थाटन करावे. एक म्हणतो तीर्थाटन आणि यातायात करत बसु नये. तीर्थाटनामध्ये पाणी व पाषाणाचेच दर्शन जर घ्यायचे आहे तर एवढी यातायात का करायची,तर एक म्हणतो तीर्थाटनाने पापाची होळी होते. दर्शनाने सर्व कामांची पूर्तता होते.

# कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

आधुनिक केसरी

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वतःचे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्माचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही. आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि खाण्याच्या



बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी. स्वतःची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वतःच्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानाने विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरूरीपुरताच ठेवावा. 'मी रामाचा आहे' असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. 'नारायणाचे दर्शन व्हावे' असे नाही प्रल्हाद म्हणाला, 'नाम सोडणार नाही' असे म्हणाला.

लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटायचा नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. 'माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस,' असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.

## गहिनीनाथ



मग त्याने आपणांस वीट मिळाल्याची हकीकत सांगितली व तिला कोणी चोरटे येऊन लुटून नेतील, ही मोठी मला धास्ती आहे, म्हणून बोलला. ते ऐकून गोरक्ष म्हणाला, अशाश्वत वित्त आता आपल्याजवळ नाही म्हणून भय देखील नाही ! हें ऐकून काहींतरी दगा झाल्याची कल्पना मच्छिंद्रनाथाच्या मनांत उद्‌भवली व त्यास तळमळ लागली. तेव्हा गोरक्षानें मच्छिंद्रनाथाचा हात धरला आणि उभयतांनी आपापल्या झोळ्या घेऊन पर्वतावर जाण्याची तयारी केली. निघण्यापूर्वी झोळी तपासतां झोळींत वीट नाही असे पाहून मच्छिंद्र गोरक्षास पुष्कळ टाकून बोलला व रडून त्याने एकच गोंधळ केला. त्या दुःखाने तो गडबडा लोळू लागला व मोठमोठ्याने रडून पिशाच्चासारखा चौफेर फिरू लागला. त्याने गोरक्षास नाही नाही ते बोलून शेवटी निघून जा. तोंड दाखवू नको, इतकेसुद्धा सांगितले. मच्छिंद्रनाथाचे ते काळजास झोंबणारे शब्द ऐकून देखील गोरक्ष उगाच राहिला व त्याचा हात धरून त्यास पर्वतशिखरावर घेऊन गेला. जातांना पर्वतावर गोरक्षाने सिद्धयोगमंत्र जपून लघवी केली. त्यामुळे तो सर्व पर्वत सुवर्णमय होऊन गेला. मग लागेल तितके सुवर्ण नेण्यास त्याने गुरूस विनंति केली.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ७ ऑक्टोबर २०२३






राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि कोलमडणारी लोकशाही पान ६





अच्छा तो हम चलते हैं, फिर कब मिलोगे पान ७


# लावणी ही महाराष्ट्राची पारंपरिक लोककला : राणी नाशिककर

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगरे**

**वैजापूर :** तालुक्यातील आचंलगाव येथे प्रभाकर कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र मंडळाच्या वतीने लावणी सांस्कृतिक कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात राणी नाशिककराच्या दिलखेचक अदाकारींसह लावण्यांचे दिमाखात सादरीकरण.करण्यात आले. सांस्कृतिक क्षेत्राला उभारी देण्यासाठी लावणी ही महाराष्ट्राची एक पारंपरिक लोककला असुन आजही जनसामान्यांना ही लोककला आपलीशी वाटते. ग्रामीण भागात आजही यात्रा उत्सव, वाढदिवस यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमात लावणी हा कलाप्रकार मोठ्या आवडीने बघितला जातो. आयोजित केला जातो. लावणी हि महाराष्ट्राची एक पारंपरिक व लोकांना आवडणारी लोककला असल्याने ती जपली पाहिजे असे मत प्रसिध्द लावणी सम्राज्ञी राणी नाशिककर यांनी व्यक्त केले.लावणी कला पुनर्जीवित करण्यासाठी, पारंपारिक लावणी जपण्यासाठी वैजापुर तालुक्यातील आचंलगाव येथे आयोजित लावणी कार्यक्रमात राणी नाशिककर बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या किं, आधुनिक युगात लावणी ही लोककला वेगळ्या वळणावर चालली आहे. मुळ लावणी कला प्रकाराला आता उभारी देण्यासाठी या लोककलेला राजाश्रय मिळणे गरजेचे आहे. कारण लावणी महाराष्ट्राची शान आहे. डोक्यावरचा ताज आहे आणि रसिक मायबापाचे प्रेम आहे.

आचंलगाव येथे उभारण्यात आलेल्या भव्य अशा रंगमंचावर लावणी सम्राज्ञी राणी नाशिककर यांनी दिलखेचक अदाकारीने बहारदार, रंगतदार लावण्या सादर करत प्रेक्षकाची मने जिंकली. गावातील महिला पहिल्यांदा लावणीच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थितीत होत्या. यावेळी पाटलांचा बैलगाडा,कच कांदा,आला बाबुराव,राजसा जगडी बसा, जीव हा पिसा', 'खेळताना रंग बाई होळीचा, काट लागे कोना माझा चोळीचा', 'इचार काय हाय तुमचा, पाहुणे विचार काय हाय' ही लावणी सादर केली.'कारभारी जरा दमान' ही लावणी राणी नाशिककर यांनी दिलखेचक अदाकारींने सादर करत प्रेक्षकांची दाद मिळवली.

पारंपारिक पद्धतीने लावण्यांचे सादरीकरण तर झालेच परंतु इतर प्रसिध्द लोकगीते वेगवेगळ्या वेशभूषेत एकापेक्षा एक सरस लावण्यांचे सादरीकरण झाल्याने बच्चे कंपनी यांनी देखील टाळ्या वाजवुन लावण्यांना दाद दिली. नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. टाळ्या, शिट्या वाजवित लावण्यांचा



मनमुराद आनंद लुटला. काही लावण्यांचा 'वन्समोअर'ही झाला. लावणी महोत्सवाला महिलांचा पहिल्यांदा मोठा प्रतिसाद मिळाला. मैदान गर्दीने खचाखच भरले होते.






# भाजपाच्या रावणप्रवृत्तीविरोधात प्रदेश काँग्रेसचे राज्यभर निषेध आंदोलन

## नाना पटोले : राहुलजींच्या केसाला धक्का लावला तर 'सळो की पळो करुन सोडू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हिंदु-मुस्लिम धार्मिक तेढ निर्माण करुन तसेच जाती-जातीमध्ये द्वेष पसरवून सत्तेच्या जोरावर भाजपा देश तोडण्याचे काम करत असताना राहुलजी गांधी मात्र संविधान, लोकशाही व देशातील एकता व अखंडता कायम रहावी यासाठी संघर्ष करत आहेत. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून राहुलजींनी भाजपाच्या हुकूमशाही व्यवस्थे विरोधात जनतेत जागृती व विश्वास निर्माण केला. राहुलजींची वाढती लोकप्रियता पाहून घाबरून भाजपाची रावणप्रवृत्ती त्यांची बदनामी करण्यावर उतरली आहे पण राहुलजींच्या केसाला धक्का लावला तर 'सळो की पळो करुन सोडू', असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. भाजपाच्या रावणप्रवृत्तीविरोधात काँग्रेसकडून राज्यभर निषेध आंदोलन करण्यात आले. मुंबईत चेंबूर रेल्वे स्टेशन जवळच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी CWC सदस्य व माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे,



महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, प्रदेश सरचिटणीस राजन भोसले यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, १९४५ मध्ये 'अग्रणी' या मराठी वृत्तपत्रात महात्मा गांधींना रावणाच्या प्रतिमेत दाखवून भाजपा व संघाच्या लोकांनी त्यांची बदनामी केली होती आता त्याच प्रवृत्तींनी इतिहासाची पुनरावृत्ती करत राहुलजी गांधी यांना रावणाच्या प्रतिमेत दाखवून त्यांची बदनामी केली आहे. देशावर जेव्हा जेव्हा संकट येते तेव्हा देशाच्या रक्षणासाठी गांधीच पुढे येतात. या देशाला गांधींनी स्वातंत्र्य मिळवून दिले व राष्ट्र म्हणून उभेही केले आहे. रावणप्रवृत्तीच्या भारतीय जनता पक्षाचा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा त्यात काडीचाही संबंध नाही. आज राहुलजी गांधी यांची जनतेत लोकप्रियता प्रचंड वाढली आहे, ते जनतेचे नायक आहेत म्हणनूच भाजपाची खलनायकी प्रवृत्ती त्यांच्याविरोधात सातत्याने कारस्थाने करत आहे. भाजपाने राहुलजींची बदनामी केल्याचा संताप काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये तर आहेच पण सर्वसामान्य जनतेमधूनही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. महात्मा गांधीजी यांनी घालून दिलेल्या तत्वानुसार काँग्रेस पक्षाने शांततेच्या मार्गाने आंदोलन केले आहे पण भाजपाने अति केले तर त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील, असा खणखणीत इशारा नाना पटोले यांनी दिला आहे. यावेळी बोलताना प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान म्हणाले की, राहुलजी गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे जनतेत आत्मविश्वास निर्माण झाला आहे. भाजपाचा सर्व ठिकाणी पराभव होत आहे, त्यांच्या डिपॉझिट जप्त होत आहेत म्हणून घाबरलेला भाजपा राहुलजी गांधी यांची बदनामी करण्याचे काम करत आहे. भाजपा व संघ गांधी परिवाराची सातत्याने बदनामी करत आला आहे. देशाची एकता व अखंडता टिकून रहावी यासाठी इंदिराजी गांधी व राजीवजी गांधी यांनी बलिदान दिले. रावणप्रवृत्ती या देशात कोणाकडे आहे हे सर्वांना माहित आहे. हुकूमशाही म्हणजे रावणप्रवृत्ती, देशाची एकता व अखंडता तोडण्याचे काम म्हणजे रावणप्रवृत्ती आहे. काँग्रेस पक्ष भाजपाचा हीन कृतीचा जाहीर निषेध करत असून असले प्रकार काँग्रेस पक्ष सहन करणार नाही, असेही नसीम खान म्हणाले.

# त्यांनी माझ्यासारख्या रस्त्यावर उतरून काम करणाऱ्याला शिकवू नये

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : उद्धव ठाकरेंच्या आरोपांवर दिले उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नांदेडपाठोपाठ नागपूर व छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात झालेल्या रुग्ण मृत्यू प्रकरणावरून राजकारण तापल्याचे पाहायला मिळत आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांवर परखड शब्दांत टीका केल आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे भाजपाकडून उद्धव ठाकरेंच्या कार्यकाळाचा दाखला देऊन प्रत्युत्तर दिले जात असताना दुसरीकडे खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच उद्धव ठाकरेंच्या आरोपांवर उत्तर दिले आहे. दिल्लीत माध्यमांशी बोलताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ



शिंदेंनी यावेळी सीबीआय चौकशी करण्याची उद्धव ठाकरेंनी मागणी चांगली आहे, अशी खोचक प्रतिक्रिया दिली. त्यांनी केलेली ही चांगली मागणी आहे. कोविडच्या काळात घोटाळे झाले. अगदी मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार त्यांच्या काळात झाला. नांदेडचा प्रकार अतिशय दुर्दैवी, वेदनादायी आहे. पण या मृतांचे राजकारण करणे त्याहीपेक्षा दुर्दैवी आहे. मयताच्या टाळूवरचं लोणी खाण्याची सवय ज्यांना लागली आहे, त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा आपण ठेवू शकत नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

ज्या लोकांनी मृतदेह ठेवायच्या पिशव्यांच्या व्यवहारात पैसे खाल्ले, ३०० ग्रॅमऐवजी १०० ग्रॅम खिचडी देऊन पैसे खाल्ले, ऑक्सिजन प्लांटमध्ये पैसे खाल्ले ते सगळे आता बाहेर येते. यावरून दुसरीकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी अशी मागणी केली आहे. कोविडमध्ये झालेल्या प्रकाराची नक्की चौकशी होईल. औषधांची खरेदी चुकीच्या पद्धतीने झाली असेल, तर त्याची चौकशी सरकार करेल. नांदेड प्रकरणाची सरकार चौकशी करत आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

**तोंडावर मास्क लावून :** कोविडमध्ये जे तोंडाला मास्क लावून घरात बसून फेसबुक लाईव्ह करत होते, त्यांनी माझ्यासारख्या रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या माणसाला शिकवू नये . मी जेव्हा पीपीई किट घालून हॉस्पिटलमध्ये मदत करत होतो, तेव्हा हे घरात बसले होते . त्यांना भेटायला येणाऱ्यांचीही अँटिजेन टेस्ट करून दोन दोन तास बसवून नंतर भेटत होते . असे मुख्यमंत्री जगाने पाहिले नसतील . त्यामुळे कोविडमध्ये माणसं मरत असताना हे घरात बसून नोटा मोजण्याचं काम करत होते . त्यांचा खरा चेहरा लोकांनी कोविडमध्ये पाहिला, असा आरोप एकनाथ शिंदेंनी केला . साधा नगरसेवकही घरात बसून काम करू शकत नाही . मग राज्याचा मुख्यमंत्री घरात बसून काम करू शकतो असं विधान करणाऱ्यांनी दुसऱ्याला शिकवण्याची गरज नाही . एक फुल, एक हाफ यांनी आम्हाला शिकवण्याची गरज नाही, असेही एकनाथ शिंदे म्हणाले .

# ईडी, सीबीआय फैलावर

आधुनिक केसरी

दिल्ली सरकारच्या अबकारी धोरण गैरव्यवहार प्रकरणातील कथित सहभागाबद्दल न्यायालयीन कोठडीत असलेले माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या जामीन अर्जावर सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी 'ईडी' आणि 'सीबीआय'ला पुराव्यांबाबत फैलावर घेतले. कथित बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात सिसोदियांचा सहभाग दर्शवणारे पुरावे तुमच्याकडे आहेत का, असा थेट प्रश्न न्यायालयाने केंद्रीय संस्थांना केला. सिसोदिया यांनी बेहिशेबी संपत्ती जमविल्याचे वस्तुस्थितीच्या आधारे आणि कायदेशीरीत्या कसे दर्शवाल? असा थेट प्रश्न न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठाने अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) यांना केला. या गुन्ह्यातून कथितपणे पैसे मिळवणाऱ्या राजकीय पक्षाला आरोपी का बनवले नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय तपास संस्थांना विचारले. सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडीला अनेक प्रश्न विचारले. सिसोदिया यांच्याविरुद्ध खटला कसा चालवला गेला, असा सवालही न्यायालयाने ईडीला केला. काही दबावगटांनी धोरणात बदल करण्याची मागणी केली होती, याचा अर्थ लाचखोरीशिवाय तेथे भ्रष्टाचार आहे किंवा तसे गुन्हे घडले आहेत असा होत नाही, असे खंडपीठ म्हणाले. ईडी आणि सीबीआयची बाजू मांडणारे अतिरिक्त न्यायअभिकर्ता एस. व्ही. राजू म्हणाले, की बेकायदा कृत्यांमध्ये सिसोदियांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आहे किंवा नाही हा प्रश्न नाही तर प्रश्न हा आहे की लाच मिळू शकेल, असे धोरण तयार केले गेल्यामुळे तो गुन्हा ठरतो. धोरण बदलते आणि प्रत्येकाला व्यवसायासाठी चांगले धोरण हवेच असते. दबाव गट नेहमीच असतात, परंतु पैशांचा विचार न करता धोरण बदल केल्यास काही फरक पडत नाही. परंतु इथे पैशाचा भाग येत असल्यामुळे तो गुन्हा ठरतो, असे न्यायालयाने नमूद केले. दबावगट असता कामा नयेत, असे म्हटले तर सरकार काम करू शकत नाही. तेथे लॉबिंग नेहमीच असते. अर्थात लाच स्वीकारली जाऊ शकत नाही, असे खंडपीठाने नमूद केले.




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# शासन आपल्या दारी, जाहिरात लय भारी..

आधुनिक केसरी

**शासन आपल्या दारी नावाचा उपक्रम शासनाने सुरू केला आणि जाहिरात जोरदार करून लोकांचे प्रलंबित असलेले काम त्वरित मार्गी लागतील अशी आशा निर्माण झाली. शासन आपल्या दारी उपक्रम वरवर पाहता असे दिसते की सर्वसामान्य लोकांचे काम शासन तत्परतेने करून त्यांना घरपोच सुविधा उपलब्ध करून देईल असेच वाटते. परंतु शासन आपल्या दारी हि केवळ लोकांची दिशाभुल करणारी जाहिरात आहे. सरकार कामापेक्षा जास्त पैसा जाहीरातीवर खर्च करत आहे याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे शासन आपल्या दारी हा उपक्रम आहे. शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या माध्यमातून सरकार ट्रीपल इंजन ची जाहिरात करून राजकीय पोळी भाजून घेण्याचे नियोजन करत आहे.**

शासन आपल्या दारी हा उपक्रम अत्यंत प्रभावशाली ठरला असता जेव्हा सर्व सामान्य लोकांचे कामं वेळेवर व भ्रष्टाचार मुक्त झाले असते. सरकार आपल्या दारी उपक्रम सुरू होऊन अनेक जिल्हामध्ये शासनाच्या दृष्टीने तो यशस्वी झाला पण लोकांच्या मते शासन आपल्या दारी उपक्रम यशस्वी झालाच नाही परंतु शासन कोणत्याही व्यक्तीच्या दारी गेलेच नाही. उलट शासन आपल्या दारी या उपक्रमाचा कार्यक्रम जिल्ह्यात एखाद्या ठिकाणी घेण्यात येतो. त्याची तयारी करायला सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग कामाला लागतो परिणामी सर्व सामान्य लोकांची कामे अजून प्रलंबित होतात. शासन अजूनही कोणाच्या दारी गेले नाही तरीही उपक्रमाला नाव शासन आपल्या दारी. म्हणजे दिवस ढवळ्या लोकांना चक्क खोट बोलून लोकांची दिशाभूल करणारा हा उपक्रम व त्याची जाहिरात आहे. जिल्ह्यातील एखाद्या ठिकाणी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री येतात, त्यांचे राजकीय भाषणे देऊन एकमेकांवर टिका टिप्पणी करतात. राजकारण झालेल्या वैयक्तीक मतभेद जनते समोर मांडून आम्हीच कसे चांगले हे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. मुळात फक्त मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणजे शासन नाही आणि कार्यक्रमाचे ठिकाण म्हणजे दार नाही. शासन आपल्या दारी म्हणायचे आणि मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी इतर राजकीय नेत्यांवर टीकाटिप्पणी करून तोंडसुख घ्यायचे. शासन आपल्या दारी या उपक्रमासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री येणार म्हणजे गर्दी दाखवावी लागणार. म्हणून सर्वसामान्य लोकांना खोट बोलुन, तुमचे प्रलंबित असलेले काम होतील असे आश्वासन देऊन, कोणाला घरकुल तर कोणाला काही अनुदानित वस्तु मिळतील म्हणून सांगितले जाते, मुख्यमंत्री तुमचे काम स्वतः करून देतील असे सांगुन लोकांना कार्यक्रम ठिकाणी आणले जाते. मी लाभार्थी म्हणुन त्याला लेबल लावले जाते. बरेच लोक भुलथापांना भुलणार नाहीत, गर्दी कमी दिसेल म्हणून या कार्यक्रमाला कर्मचारी वर्गाला उपस्थित राहण्याची सक्ती केली जाते. शासन आपल्या दारी उपक्रमा अंतर्गत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे भाषण जे लोकांच्या कोणत्याही कामाचे नसलेले ऐकण्यासाठी शासनाकडून बसेस ची मोफत सोय करून दिली जाते. कार्यक्रम ठिकाणी सर्वांना पुरणार नाही पण नावाला जेवन, नास्ता, चहा पाण्याची सुविधा करून दिली जाते. जनतेला बसायला खुर्ची आणि डोक्यावर सावलीसाठी मंडप टाकला जातो. डेकोरेशन, साऊंड सिस्टीम, मंडप, चहा नास्ता, जेवन, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचा येण्या जाण्याचा खर्च, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सुरक्षेसाठी वाढवलेले सैन्य बळ, यांचा एकत्रित खर्चाचा जर विचार केला तर करोडो रुपये एका कार्यक्रमावर सरकार खर्च करून मोकळे होते. शासन दारीही येत नाही आणि ज्या लोकांना लाभार्थी म्हणून दाखवले जाते त्यांना कोणताही लाभही मिळत नाही. या उपक्रमाच्या कार्यक्रमाला तरुण तडफदार माणसेच नाही तर महिला, अपंगत्व असलेल्या लोकांना खोट बोलुन आणले जाते. जेथे शासन आपल्या दारी नावाखाली मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री राजकीय भाषणे करतात आणि त्यासाठी केवळ गर्दी दिसावी म्हणून सर्वसामान्य लोकांचे हाल करत असतील, कार्यक्रम ठिकाणी नेऊन अपेक्षा भंग करत असतील तर शासन आपल्या दारी या उपक्रमाचा कोणाला आणि काय फायदा? प्रलंबित असलेले काम तसेच पडून आहेत. अनेक वेळा चकरा मारून काम होत नाहीत. वरून कामांनुसार लाचेची मागणी होते तो विषय वेगळाच. त्यापेक्षा मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री म्हणजे शासन होत नाही तर शासनाच्या परिभाषेत जे जे लोक येतात त्यांना प्रामाणिक पणे, व वेळेवर काम करून सर्व सामान्य लोकांचा आदर करायला शिकवले तरीही लोकांचे नव्वद टक्के काम होतात. कारण सर्व सामान्य लोकांचे नव्वद टक्के काम हे शासकीय कर्मचारी अधिकारी यांच्या वेळ, प्रामाणिक पणा, लोकांचा आदर यामुळे च थांबलेले असतात. अधिकारी कर्मचारी वेळेवर न येणे, आले तरीही वेळेवर कामाला सुरवात न करने, काही काम करून देण्यासाठी लोकांकडून होईल तेवढ्या पैशाची मागणी करणे, महिला, जेष्ठ नागरिक व शारीरिक विकलांग व्यक्तीला बसण्याची योग्य सुविधा नसने ह्या मुळे सर्वसामान्य जनता त्रस्त होते यावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. अनेक शासकीय कार्यालयामध्ये सर्व सामान्य लोकांसाठी स्वतः गृहच एवढे घाण आहेत की तेथे जाण्या अगोदरच लोक वासानेच परत येतात, बसण्याची पुरेशी सोय नसते, बाहेरगावाहून आलेल्या लोकांना कामासाठी उशीर होतो, त्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नसते. लोकांच्या ह्या समस्या मुख्य आहेत. ह्या समस्या सोडवण्यासाठी शासन आपल्या दारी उपक्रम काही उपाययोजना करताना दिसत नाही. केवळ मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सभेला येण्यासाठी बसेस मोफत दिल्या जातात तोच पैसा शासकीय कार्यालयाचे सुशोभीकरण करण्यासाठी वापरला तर आणि तेथे लोकांना बसण्याची व स्वतः गृह पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा केली तर लोकांना नक्की च फायदा होईल. कार्यक्रमाच्या ठिकाणी लोकांना बोलावून त्यांना खोटे आश्वासन दिल्या पेक्षा वेळेत लोकांचे काम करून देण्याची सक्ती कर्मचारी अधिकारी यांच्या वर करून, जर कामे वेळेवर नाही झाले जनतेच्या घरी जाऊन ते काम करून देण्याच्या पद्धतीला आपण शासन आपल्या दारी उपक्रम म्हणु शकतो. एखाद्या विभागात वारंवार चकरा मारुनही सर्वसामान्य लोकांचे काम होत नसेल तर तक्रार कुठे आणि कशी करावी जेणेकरून कामचुकार लोकांवर वचक निर्माण होईल याबाबत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री बोलत नाहीत. याचाच अर्थ शासन आपल्या दारी हि फक्त जाहिरात आहे वास्तविक परिस्थिती वेगळी आहे. शारीरिक विकलांग, जेष्ठ नागरिक, महिला यांना शासन आपल्या दारी उपक्रमांच्या नावाखाली एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात इच्छे विरूद्ध नेले जाते, ज्याला चालण्यासाठी अडचण आहे, ज्यांना बसण्या उठण्याची अडणच आहे, ज्यांना शारीरिक आजार आहेत अशा ही लोकांना महिलांना वेगवेगळ्या आमिषाने कार्यक्रम ठिकाणी नेले जाते आणि त्या उपक्रमाला नाव दिले जाते शासन आपल्या दारी, विकलांग, जेष्ठ नागरिक व महिला यांचे शासकीय कामे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या घरी अथवा लोकांना येजा करण्यासाठी जास्त वेळ व त्रास होणार नाही अशा ठिकाणी बोलावून करून द्यायला पाहिजे परंतु केवळ गर्दी दाखवण्यासाठी या ही लोकांचा वापर करून घेतला जातो. यातून सरकार किती निर्दयी व जाहीरातबाज आहे हे दिसुन येते. शासन आपल्या दारी हा उपक्रम सुरू केलाच तर या उपक्रमाचा फक्त राजकीय वापर न करता, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री प्रत्येक गावात जाऊ शकत नाही याची जाणीव नागरिकांना आहे परंतु किमान शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री येत आहेत, लोकांना मोफत बसेस देऊन बोलावले जात आहे तर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कमीत कमी लोकांच्या समस्या काय आहेत, लोकांचे कामं का प्रलंबित राहतात, अधिकारी कर्मचारी सर्व सामान्य लोकांसोबत कसे वागतात हे तरी लोकांकडून जाणून घेणे अपेक्षित होते. परंतु मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आले आणि शासन आपल्या दारी उपक्रमाचा कार्यक्रम करून गेले पण लोकांचे काम जसे होते तेथेच आहेत. मग करोडो रुपयाचा चुराडा कशासाठी करायचा? जनतेचा पैसा जनतेच्या हितासाठी, जनकल्याणासाठी वापरला गेला पाहिजे पण शासन आपल्या दारी उपक्रमा अंतर्गत शासन शासकीय योजना व शासकीय उपाय योजना लोकांपर्यंत पोहचवत नाही तर त्यांचा राजकीय उद्देश साध्य करून एकमेकांवर टिका करायला या कार्यक्रमांचा वापर केला जात आहे. इतरांनी काय केले त्या पेक्षा कार्यरत असलेले सरकार काय करते हे महत्त्वाचे असते. परंतु मुख्यमंत्री साहेबांना कदाचित याची माहिती नसेल म्हणून बहुतांश कार्यक्रमातुन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दोघेही बोलताना बोलताना त्यांनी हे केले नाही, त्यांनी ते केले नाही, अहो साहेब त्यांनी त्यांच्या हातात सत्ता होती तर त्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून लोकांच्या अडचणी वाढवल्या, तुम्ही तर सत्तेचा चांगला उपयोग करून जनतेच्या अडचणी सोडवा. त्यांनी सत्तेचा दुरूपयोग करून लोकांना काहीच मिळू दिले नाही ठिक आहे मान्य आहे, पण तुम्ही सत्तेचा चांगला वापर करून लोकांना सर्वकाही मिळवून देऊ शकता ना. तुम्ही तर सत्तेचा वापर केवळ अगोदरच्या सरकारवर तोंडसुख घ्यायला च करता परंतु त्या अगोदर तुमचेच सरकार होते. मग तुम्ही तेव्हा चांगले काम करू शकत नव्हते? मधल्या काळात अडीच वर्षात आपण खुप मुद्दे उचलून धरले. अडीच वर्षात सत्ता पालट झाला तर तुम्हीच उचलून धरलेले मुद्दे सोडवले गेले का? याचे उत्तम गृहमंत्री यांनी देणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. केवळ प्रत्येक ठिकाणी राजकारण करून जनतेला वेठीस धरणे व आपली राजकीय पोळी भाजुन घेणे आता तरी बंद व्हायला पाहिजे. कारण राज्यकर्ते जनतेचे काम न करता आपापसात सत्तेची व पैशाची वाटाघाटी करून स्वतः चे घर भरून घेतात, विरोधी पक्षात असलेला नेता भ्रष्ट असतो तोच सत्तेचा भाग बनला तर स्वच्छ चारित्र्य संपन्न होतो. ही खेळी जनता ओळखून आहे म्हणून कोणत्याही राजकीय नेत्याच्या सभेला स्वयंस्फूर्तीने लोक जायला तयार नाहीत.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# शासकीय रुग्णालयातील मृत्यूचे तांडव

आधुनिक केसरी

**नांदेड आणि संभाजीनगर शासकीय रुग्णालयातील रूग्णांचे मृत्यूचे तांडव पहाता महाराष्ट्राची आरोग्य सेवा कोलमडल्याचे दिसून येते. नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर शासकीय रुग्णालयातील रूग्णांच्या मृत्यूची घटना अंगावर शहारे येणारी आहे.राज्यातील शासकीय रुग्णालयाची खरी अवस्था काय आहे ही बाब राज्याच्या १३ कोटी जनतेला चांगल्याच प्रकारे ग्यात आहे.परंतु आता महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालये मृत्यूचे माहेरघर बनले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधांचा ढींढोरा पीटला आणि सर्वांना सरकारमार्फत चांगल्याप्रकारे आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यात येईल असेही सांगितले.**

परंतु आज देशाच्या १४० कोटी जनतेच्या डोळ्यांसमोर नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आणि छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात गेल्या तीन दिवसांपासून मृत्यूचा थैमान सुरू आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. ऐकीकडे बिच्चारे रूग्ण दगावत आहे आणि दुसरीकडे राजकीय पुढारी राजकारण करण्यात मग्न असल्याचे दिसून येते. शासकीय रूग्णांलयात सरकारने योग्य सुविधा प्रदान केल्या असत्या तर राज्यात खाजगी रुग्णालयांचा बाजार आणि व्यापार लागला नसता.गोरगरीबांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने शासकीय रुग्णालयात धाव घेतात. परंतु आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयावरून असे लक्षात येते की हे रूग्णांलय नसुन मृत्यू खाणा आहे की काय असे सर्वसामान्यांना वाटत आहे. अजुनही नांदेडच्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मृत्यूचे सत्र थांबता थांबेनासे झाले आहे गेल्या ३ दिवसांत तब्बल २२ बालकांसह ४८ मृत्यू व २५ पेक्षा जास्त बालके अद्यापही अत्यवस्थ आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.तर दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात २४ तासांत तब्बल १८ रूग्णांचा मृत्यू झाला. या संपूर्ण बाबी सरकार मार्फत रूग्णांना मिळणाऱ्या अपुऱ्या सोईसुविधांमुळे निर्माण झाल्याचे सांगितले जाते.सरकार पाच लाखांपर्यंत उपचार मोफत मिळणार असे सांगत असतांनाच, प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयात औषधांच्या अभावामुळे व तुटवड्यामुळे रूग्ण दगावतात आहे हे सरकारला का दिसत नाही? या संपूर्ण घटनांवरून असे दिसून येते की सरकारच्या सुविधा फक्त कागदावरच आहे की काय असे वाटत आहे. त्याचे प्रायचीत्य सर्वसामान्यांना व गरीबांना भोगावे लागत आहे. कुठे गेली शासकीय यंत्रणा,राज्यात रूग्णांसाठी अनेक योजना मग सरकारी रूग्णांलयात मृत्यूचे तांडव का?या संपूर्ण बाबींचा सरकारने गांभीर्याने विचार करून राज्यातील संपूर्ण शासकीय रूग्णालयांना अत्याधुनिक सुविधा पुर्ववत केल्या पाहिजेत जेणे करून रूग्णांचे प्राण वाचेल व गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयात जाण्याची वेळ येवू नये अशा पध्दतीचे कार्य सरकारने युध्दपातळीवर करायला हवे.राज्यात नांदेडच्या



डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय किंवा छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात ही पहिलीच घटना नसुन राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयात प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे व गैरसोयीमुळे अनेक रूग्ण दगावले आहेत.या संपूर्ण घटनांची सरकारने गांभीर्याने दखल घेऊन ताबडतोब शासकीय रुग्णालयांना रूग्णांच्या दृष्टीकोनातु योग्य पावले उचलुन संपूर्ण सुविधां रूग्णांपर्यंत कशा पोहचविता येईल या उद्देशाने पावले उचलली पाहिजेत. आता शासकीय रुग्णालयाच्या बाबतीत बघ्याची भूमिका नकोच किंवा "मला पहा आणि फुले वाहा" अशी भूमिका नको.कारण प्रत्येकांचे प्राण मोलाचे असतात. कोणाचे प्राण जर चुकांमुळे जात असेल तर ही अत्यंत गंभीर आणि जिव्हाळी लागणारी बाब आहे आणि आज जे आपण शासकीय रुग्णालयातील मृत्यूचे तांडव पाहत आहे ते प्रशासनाच्या व सरकारच्या चुकांमुळे निर्माण झालेले मृत्यू तांडव आहे. नागपूर शहरातील मेडिकल आणि मेयो या दोन शासकीय रुग्णालयांमध्ये ७२ तासांत ६३ रूग्णांचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले जाते. यातील ४३ मृत्यू मेडिकलमध्ये तर २० मृत्यू मेयोमध्ये झाले असल्याची माहिती समोर आली आहे. परंतु यात खाजगी रुग्णालयातून मेडिकलमध्ये रेफर केलेल्या ३४ रूग्णांचा मृत्यूमध्ये समावेश आहे. त्यामुळे सरकारने आता खाजगी रुग्णालयांवर सुध्दा कठोर कारवाई करून त्यांच्या मुसक्या आवळने गरजेचे आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालयांची मनमानी सुरू असून रूग्णांजवळून मोठ्या प्रमाणात अवाढव्य फी आकारली जाते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दलित वस्तीत नागरी सुविधा नसल्याने आगरनांदुर ग्रा.पं.समोर आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आगर नांदूर ग्रामपंचायत कार्यालयासमोर गावकऱ्यांच्या वतीने विविध मागण्यांसाठी १० ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आपेगाव ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणारे हे गाव गेल्या दोन वर्षांपूर्वी या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा देण्यात आलेला असून एक वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन सरपंच विराजमान झालेले आहेत. पैठण शहागड मुख्य महामार्गावर असलेले हे आगरनांदूर गाव आजही एखाद्या दुर्गम जंगलात असल्यासारखे वाटत आहे. या गावात पिण्याची पाण्याची, स्वच्छता, नाल्या, रस्ते, आरोग्य व पाणीपुरवठा या नागरी सुविधेचा अभाव दिसून येत आहे. गावातील दलित वस्तीमध्ये तर अक्षरशा चिखलाचे आणि घाणीचे साम्राज्य झालेले दिसून येत आहे तर गटारातील किडे आणि अळ्या चक्क रहिवाशांच्या घरात शिरत आहेत.

आगर नांदूर गावासह दलित वस्तीमध्ये नागरी सुविधा पुरवाव्यात या मागणीसाठी रवी कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षापासून अनेक निवेदने आणि आंदोलने करण्यात आली आहेत. परंतु स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील या गावात आजही रस्त्यांची, गटारांची आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करता आली नाही. गावकऱ्यांना आजही पिण्याचे पाणी विकत घेऊनच पाणी प्यावे लागते. या सर्व सुविधा निर्माण कराव्यात यासाठी मंगळवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी आगर नांदूर ग्रामपंचायत कार्यालयावर गावकऱ्यांच्या वतीने करण्याचा लेखी इशारा पैठण पंचायत समिती कार्यालयास दिला आहे. गावातील समाजसेवक रवींद्र कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनावर अशोक गायकवाड, राजू मातंग, प्रयागाबाई कोल्हे, नितीन प्रव्हाणे, सोपान पवार, कांताबाई कोल्हे, सत्यभामा पवार, अनिल कुढारे, जावेद शेख, बाबा नूर सय्यद, कमल मातंग, गणेश प्रव्हाणे, मोहन प्रव्हाणे, अमीना शेख, आशा प्रव्हाणे यांच्यासह शेकडो गावकऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# बोगस आदिवासींना जात पडताळणी प्रमाणपत्र देऊ नये : आदिवासी टायगर सेना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जळगाव या जिल्ह्यामध्ये बोगस आदिवासी प्रमाण वाढत चालले आहेत. या जमातीं ठाकूर, टोकरे कोळी मल्हार कोळी, महादेव कोळी या बोगस जमातींनी शासनाच्या योजना घेत आहेत. परंतु या अनुषंगाने शासनाच्या काही बुद्धीजीव कर्मचाऱ्यांना हाताशी घेऊन बोगस जातीचे प्रमाणपत्र घेऊन शासनाच्या योजना घेत आहेत. व धुळे- जळगाव जिल्ह्यातील खऱ्या आदिवासी विविध योजना पासून वंचित आहेत. या मध्ये ठाकूर, महादेव कोळी, टोकरे कोळी , मल्हार कोळी या जमातीच्या नामसदृश्य आडनाव असलेले परंतु ठाकूर, महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी या जमातीशी कोणताही सांस्कृतिक पारंपारिक व सामाजिक संबंध नसलेल्या ठाकूर व कोळी जातीचे लोक नंदुरबार,धुळे व जळगाव या जिल्ह्यात आढळतात. तर काही बोगस आदिवासी संघटना शासनावर विविध प्रकारे दबाव आणून जमातीच्या प्रमाणपत्राचे मागणी करत असतात,व शासनाच्या खऱ्या आदिवासींना मुळ प्रवाहात आणण्याच्या शासनाच्या धोरणास पायबंद बसतो. सदर बोगस आदिवासी लोक शासनाच्या धोरणाची अवहेलना करतात. सदर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती मार्फत दिले जाणारे प्रमाणपत्रची महाराष्ट्र शासन निर्णय राजपत्र ,रजि.नं/टीइसीएच / 47-303 / एमबीआय / 2000 दिनांक 23 में 2001 या शासन निर्णय अंमलबजावणी करूनच सदर लाभार्थींना आदिवासी जमाती- जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात यावी. असे निवेदन सहआयुक्त अनुसूचित जमाती जातपडताळणी प्रमाणपत्र कार्यालय,धुळे यानां आदिवासी टायगर सेना मार्फत देण्यात आले . यावेळी राज्यसचिव ॲड.प्रवीण मोरे , उपाध्यक्ष महाराष्ट्र किशोर ठाकरे, रवींद्र ठाकरे ,गोविंद अहिरे, कृष्णा मालचे वासुदेव ठाकरे,गुलाब सोनवणे, दिनेश पिंपळसे,विष्णू पगारे, विजय मालचे,विठ्ठल सोनवणे आदी पदाधिकारी होते.

# वनविभागातर्फे वन्यजीव सप्ताह कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**कुंडलवाडी :** वनविभाग बिलोलीच्या वतीने वन परिक्षण देगलूर अंतर्गत वन उद्यानात वन्यजीव सप्ताह कार्यक्रम संपन्न झाले असुन, प्रतीवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा वनविभागाच्या वतीने कस्तुरबा गांधी कन्या शाळेतील विद्यार्थिनींना वनविभागाचे अधिकारी शेख फरीद यांनी वन्य प्राणी, पक्षी व झाडांचे महत्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी वनरक्षक डी. एन. मुसले, ए. वाय. गायकवाड, मुख्याध्यापिका सावळे मॅडम यांच्यासह सहशिक्षक कोतवाड, गायकवाड, सहशिक्षक रेड्डी आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.





# ठरवून दिलेल्या मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पन्नी वापरणाऱ्या व्यापाऱ्याविरुध्द कारवाई


आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शासनाने ठरवून दिलेल्या मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या बॅग पन्नी वापरणाऱ्या व्यापाऱ्याविरुध्द वेरुळ येथे दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यामुळे पन्नी बॅग वापरणाऱ्यात एकच खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत वेरुळ येथे जिल्हा परीषद औरंगाबाद येथिल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना, मा उप मुख्य कार्यकारी अधिकारी पं. ओम प्रकाश रामावत, मा उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्वच्छता राजेंद्र देसले शासनाने ठरवुन दिलेल्या मायक्रॉन पेक्षा कमी जाडीचे प्लास्टीक बॅगच्या वापरावर बंदी असल्यामुळे व्यापरी व ग्रामस्थ यांनी प्लास्टीक वापरत असतील तर दंड आकारण्यात यावे यांनी असे आदेशीत केल्यामुळे.

मा गट विकास अधिकारी प्रकाश नाईक, विस्तार अधिकारी पं श्री हरकचंद कहाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गांवात व आठवडी बाजारात प्लास्टीक बॅगचा वापर करीत असल्याचे ग्रामपंचायतीस निदर्शनास आल्यामुळे जे व्यापारी शासनाने ठरविल्याप्रमाणे प्लास्टीक बॅग न वापरता कमी मायक्रॉनचे प्लास्टीक बॅग वापरुन व्यवसाय करीत असल्या बाबत आढळून आले अशा ०६ व्यापारी यांना जायमोक्यावर जाऊन दंड आकारण्यात आला व समज देण्यात आली की, आपण जर प्लास्टीक बॅगचा वापर केला तर द्रव्य दंड ही दोन पटीने करण्यात येईल. तसेच ईतरही व्यापरी यांनाही प्लास्टीक बॅग न वापरण्या बाबत आव्हान करण्यात आले. ही मोहिम यशस्वी करण्याकरीता ग्रामपंचायत वेरुळ चे सरपंच कुसुम पाटील, ग्रामविकास अधिकारी स्वप्नील जगन्नाथ घरमोडे, माजी सरपंच प्रकाश पाटील, माजी सरपंच साहेबराव पांडव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश लोखंडे, ग्रा पं सदस्य जितु हजारी, ग्रा पं कर्मचारी मो नईमोद्दीन, राजेश आडे यांनी प्रयत्न केले.

# खुलताबाद येथे गुडघेदुखी, कंबरदुखी आजारासंदर्भात मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठान व एमजीएम रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने खुलताबाद तालुक्यातील नागरिकांसाठी गुडघे दुखी व कंबर दुखी आजारासंदर्भात वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिर येथे 11 ते 15 ऑक्टोबर 2023 रोजी मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांनी दिली. आ.सतीश चव्हाण म्हणाले की, आज असंख्य नागरिकांना गुंडघे दुखी, कंबर दुखी अशा आजारांना सामोरे जावे लागत आहे. या आजारांवर उपचार करण्यासाठी लागणारा लाखो रूपयांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. ग्रामीण भागातील जनतेची आरोग्य समस्येमुळे होणारी परवड टाळता यावी म्हणून गुडघे दुखी व कंबर दुखी आजारासंदर्भात हे मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मुंबई येथील प्रसिध्द अस्थीरोग तज्ञ डॉ.अबी तुरब चुनियाँ व त्यांची या शिबीरात रूग्णांवर उपचार करणार असल्याचे आ.सतीश चव्हाण यांनी सांगितले. चार दिवस सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत होणाऱ्या या शिबीरात 11 ऑक्टोबर रोजी खुलताबाद शहर व वेरूळ सर्कलमधील रूग्णांची, 12 ऑक्टोबर रोजी गदाना सर्कलमधील रूग्णांची, 13 ऑक्टोबर रोजी बाजार सावंगी सर्कलमधील रूग्णांची तपासणी करण्यात येईल. तपासणीकरिता रूणांना पूर्व नाव-नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी रूग्णांनी खुलताबाद शहर- गजानन फुलारे, रावसाहेब फुलारे, वेरूळ सर्कल- ज्ञानेश्वर दुधारे, नानासाहेब चंद्रटिके, गदाना सर्कल- अनिल चव्हाण, ज्ञानेश्वर मातकर, बाजार सावंगी सर्कल- भगवान कामठे, प्रकाश नलावडे यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त गरजू रूग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सतीश चव्हाण, एमजीएम रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.आर.बी.बोरा, डॉ.गिरीश गाडेकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# इतिहासाचा डोळस अभ्यास आणि छत्रपती शिवराय



प्रा.प्रशांत शिरुडे
संपर्क क्र. 9967817876

आधुनिक केसरी

**इतिहासाचे अवजड ओझे डोक्यावर घेऊन न नाचा करा पदस्थल त्याचे आणि चढूनी त्यावर भविष्य वाचा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विं.दा. करंदीकर सांगतात इतिहासातून मानवाला बोध घ्यायला हवा. परंतु मानव इतिहासाला कवटाळून बसतो. मग त्याच्या श्रद्धांना धक्का लागला की जाळपोळ, दंगली, आंदोलने त्यातून जीवित व वित्तहानी होतेच. खरं तर इतिहास म्हणजे समृद्ध भविष्याकडे नेणारा महामार्ग पण वर्तमान काळात विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचाही इतिहासाकडे बघण्याचा व अभ्यासण्याचा दृष्टिकोन हा खूपसा सकारात्मक दिसून येत नाही. त्याबद्दल त्यांच्या मनात अनेक गैरसमज असतात. जसे इतिहास म्हणजे होऊन गेलेल्या घटना.**

त्यामुळे शत्रूला युद्ध सज्जतेला पूर्ण वेळ मिळे. शत्रू शरण आल्यास त्याला माफ करत. परकीय आक्रमकाला मात्र या गोष्टींची चाड नव्हतीच. लढाई जिंकल्यानंतरही ते सैनिकांशी, जनतेशी, महिलांशी अत्यंत अमानुषपणे विकृत व्यवहार करत. आक्रमकाकडे अधिक प्रगत शस्त्रास्त्रे होती भारतीय राजांकडे ती नव्हती किंवा त्याचे प्रमाण फार कमी होते. या गोष्टींचा छत्रपती शिवाजी महाराजांनी चांगलाच अभ्यास केलेला दिसून येतो. याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराजांनी कधीही मिळालेल्या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला नाही. याउलट निर्माण झालेल्या परिस्थितीचा जास्तीत जास्त स्वराज्य वाढीसाठी कसा उपयोग करून घेता येईल यावर अत्यंत सावध होऊन काम केले. महाराजांनी आपल्या सैन्याला कुणासाठी न लढता हिंदवी स्वराज्यासाठी लढण्याची आगळीवेगळी प्रेरणा दिलेली होती. म्हणूनच तर पुरंदरच्या युद्धात मुरारबाजी देशपांडे पडल्यावरही मराठे लढत होते. कोंढाण्यावर तानाजी मालुसरे पडल्यावरही मराठ्यांनी विजय मिळवला. 1680 मध्ये महाराज निवर्तल्यानंतर औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत (1707) पर्यंत स्वराज्यावर अनेक संकटे कोसळत असताना मराठे अनेक वेळेला नेतृत्वाविना लढले. त्या ठिकाणी अनेक निर्णय परिस्थिती बघून स्वतःच घेतले व विजयी झाले.

पूर्वी अनेक युद्धांमध्ये शत्रूच्या अपुऱ्या माहितीमुळे आपला युद्धात पराभव होत होता. उदा. देवगिरीच्या रामदेवराय यादवांना अल्लाउद्दीन खिलजी गडाच्या पायथ्याशी येईपर्यंत समजलेच नव्हते की शत्रुने आपल्यावर आक्रमण केले आहे. खानवाच्या लढाईत माहितीच्या अभावामुळेच राणासांगाला नाही कळले की बाबराकडे असलेला तोफखाना आणि बंदुका यांना तोंड कसे द्यावे. भारतीय राजांवर विजय मिळवणाऱ्या बहुतेक परकीय राजांकडे स्वतःचे राखीव दल असे. त्यामुळेच भारतीय राजांनी अनेकदा जिंकत असलेली युद्धे गमावली. उदा. अल्लाउद्दीन खिलजीचे देवगिरी येथे रामदेवरायाशी झालेल्या या युद्धात पाठीमागे प्रचंड मोठी राखीव सेना असल्याची अवई अल्लाउद्दीन खिलजीने उठवून दिल्यामुळे रामदेवरायच्या सैन्याचे मानसिक धैर्य कोलमडते. त्यांना पराभव स्वीकारत नामुष्कीचा तह करावा लागतो. महाराजांनी आपल्या गड, किल्ल्यावर राखीव दलाची वेगळी व्यवस्था केल्याचे दिसून येते. त्यांचे गुप्तहेरखाते प्रभावी असल्या कारणाने शत्रूचे मनसुबे, संकल्पना, शत्रूची विश्रांतीची वेळ, मनोरंजनाची वेळ, यासह युद्ध साहित्य, तोफा, दारूगोळा, शत्रुगोटातील खडान-खडा माहिती मिळे. त्यामुळे शत्रूवर केव्हा व कसे आक्रमण करायचे याचे संपूर्ण नियोजन महाराज आणि त्यांचे सेनानी आखत व त्यात कधीही चूक झाल्याचे दिसून येत नाही. महाराजांनी शत्रूवर अचानक केलेल्या हल्ल्यात शत्रु गाफील असल्यामुळे तो सावध होईपर्यंत महाराजांचे सैन्य शत्रूचे बरेच नुकसान करण्यात यशस्वी होत व शत्रू सावध होईपर्यंत महाराजांचे सैन्य तिथून निघूनही जात असे या संपूर्ण नियोजनात महाराजांच्या सैन्याचे काहीही नुकसान होत नसे किंवा अतिशय अल्प नुकसान होई या उलट शत्रूचे मोठे नुकसान होई शत्रूच्या मनात कायम भीती व दहशत निर्माण होई. त्यांनी ज्या युद्धतंत्राचा बेमालुमपणे वापर केला त्या युद्धतंत्राला 'गनिमीकावा' असे म्हणतात हे तंत्र त्यांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाल्याचे दिसून येते. पुढे जगातील अनेक सेनापतींनी महाराजांच्या या युद्धतंत्राचा अभ्यास केला व यशस्वी रित्या वापरही केला.

यापूर्वीच्या आपल्यावर झालेल्या अनेक आक्रमणांमध्ये असे दिसून येते की शत्रू ज्या प्रदेशात आक्रमण करत त्या प्रदेशातील केवळ राजा व सैन्य यांनाच लक्ष न करता सर्वसामान्य जनता व महिला वर्ग यांच्यावरही अन्याय व अत्याचार करत, शेतीची नासधूस करत, त्यामुळे रयतेच्या मनात या आक्रमकांविषयी एक प्रकारचा राग, संताप यासोबत भीती सुद्धा होती. महाराजांनी ज्या ज्या प्रदेशात आक्रमणे केली तेथील रयतेच्या केसाला सुद्धा धक्का लागणार नाही याची काळजी घेतली, शेतीची नासाडी होऊ नये, पिकांचे नुकसान होऊ नये म्हणूनही काळजी घेत, महिलांशी अत्यंत सन्मानाने वागत. ही महाराजांची युद्धनीती होती. महाराजांच्या या धोरणामुळे महाराजांना रयतेकडून ज्या प्रमाणात सहकार्य मिळाले त्या प्रमाणात रयतेचे सहकार्य त्यापूर्वीच्या राजांना मिळाल्याचे दिसत नाही. शत्रूच्या प्रदेशातील रयतेत सुद्धा महाराजांविषयी आत्मीयता निर्माण होई. महाराजांच्या या नीतीला त्यांच्या अनेक कट्टर शत्रूंनी सुद्धा चांगल्या शब्दात दाद दिली आहे. अनेक वेळेला भारतीय राजे युद्धात जिंकायचे पण तहात गमवायचे महाराजांनी या गोष्टीचा चांगलाच अभ्यास केलेला दिसून येतो त्यांनी केलेले सर्वच तह हे स्वराज्याच्या हिताचेच असत. अगदी नाईलाजास्तव कराव्या लागलेल्या पुरंदरच्या तहात सुद्धा महाराज अनेक महत्त्वाचे किल्ले स्वतःकडे ठेवून घेण्यात यशस्वी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ युद्धासाठीच नाही तर राज्य कारभार व्यवस्थित व्हावा, रयत सुखी राहावी म्हणून राज्यकारभार करताना सुद्धा इतिहासाचा आधार घेतल्याचे दिसून येते. अगदी मग रामायणातील रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणताना त्यांनी रघुनाथ नारायण हणमंते यांचेकडून राज्यव्यवहारकोष तयार करवून घेतला. हा राज्यव्यवहारकोष तयार करताना याआधी उत्तम राज्यकारभार असणाऱ्या विजयनगरच्या राज्यव्यवहारकोषा चा उपयोग केला व विजयनगरच्या राजांनी सुद्धा हा त्यांचा राज्यव्यवहारकोश तयार करताना वेद उपनिषदांचा आधार घेतला होता. हे जागतिक दर्जाचे इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. म्हणूनच महाराजांची रयत त्यांच्यावर जीवापाड प्रेम करत होती. रयत ही स्वराज्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास मागेपुढे पाहत नव्हती. कारण रयतेला स्वराज्य आपलेच वाटत होते.जणू प्रत्येकजण मी शिवाजी याच भूमिकेत जगत होता. याची अनेक उदाहरणे आपल्याला शिवचरित्रात मिळतात. आज तुम्हीं आम्हीं सर्वांनी आपण निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्तम काम करणे हाच एक शिवरायांचा मावळा म्हणून त्यांना केलेला मानाचा मुजरा असेल. त्या माध्यमातून देशाचेही भविष्य उज्ज्वल करण्यासाठीच्या महासागररुपी कार्यात आपल्यामुळे एका थेंबाची निश्चितच भर पडेल. अशा असंख्य थेंबानी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळेच हा भारत देश उद्या आत्मनिर्भर होऊन जगात विश्वगुरु होईल यात शंकाच नाही. एक भारतमातेचा पुत्र म्हणून, एक राष्ट्राभिमानी शिक्षक म्हणून मी माझ्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी 'इतिहासाचा डोळस अभ्यास आणि छत्रपती शिवराय' हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मित्रांनो या लेखामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी इतिहासाच्या अभ्यासातून वर्तमानकालीन समस्या कशा प्रकारे सोडविल्या व त्यातून स्वराज्याची भविष्यवेधी वाटचाल कशी केली हे मांडण्याचा मी प्रयत्न केला. त्याचबरोबर मित्रांनो इतिहास हा विषय आपल्यासाठी जागल्याचेच काम करताना दिसतो कारण तो आपल्या वर्तमानातील संकटाचे निवारण करत भविष्य उज्वल करण्यासाठी मदत करतो. हे आजच्या दृष्टिकोनातून मांडण्याचाही प्रयत्न माझ्या अल्प बुद्धीप्रमाणे केला आहे. तुम्हीं माझे विचार काळजीपूर्वक वाचले याबद्दल मी आपला ऋणी आहे. माझ्या लिखाणातली न्यूनाधिक्य पुरते-सरते करून घ्यावे व कमी अधिक तीव्र रचनेबद्दल माफ करावे. "फोडिले भांडार धन्याचा तो माल | मी तो केवळ हमाल भारवाही||" ही तुकोबारायांची उक्ती तुम्हासारख्या जाणत्यांकडून खरे तर सगळे काही घेऊनच मी हे माझे म्हणून लिहितो. याबद्दलही माझ्या लिखाणाचा उदार मनाने स्विकार करावा.

# राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि कोलमडणारी लोकशाही



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**कोणत्याही देशातील लोकशाहीची विश्वासार्हता त्या देशातील विधिमंडळावर अधिक अवलंबून असते. नेत्याचे गुण, अवगुण आणि चारित्र्य लोकशाहीला अधिक प्रभावित करत असते. स्वातंत्र्यानंतर भारतीय विधिमंडळ आणि त्यांच्या नेत्यांची जनतेप्रती असलेली निष्ठा आणि जबाबदारीचे कौतुक केले जात होते, परंतु आता तेच कायदेमंडळ गुन्हेगारी कृत्यांनी कलंकित झाली आहे. राजकारणात गुन्हेगारी घटकांचे वर्चस्व आहे आणि संसदेपासून ते विधानसभेपर्यंत सर्व काही गुन्हेगार आणि कलंकित नेत्यांनी भरलेले आहे. अशा परिस्थितीत प्रामाणिक लोकशाहीची कल्पना कशी करता येईल?**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वातील राजकारणाचे गुन्हेगारीकरण पाहिल्यावर आपले डोके शरमेने झुकते. जे सभागृह कधीकाळी जनतेच्या प्रश्नांनी गुंजत असे, विविध वक्त्यांची ऐतिहासिक भाषणे संसदेपासून रस्त्यांपर्यंत चर्चिली जायची, त्या लोकशाहीच्या गुणवत्तेचा जगालाही हेवा वाटायचा, आज तीच लोकशाही, कलंकित नेत्यांच्या उपस्थितीमुळे सभागृहाचा अवमान होत आहे.. सभागृहातील गोंधळ बघितला तर बागणाऱ्याला लाज वाटेल. भारतीय संसदेचा आत्तापर्यंतचा इतिहास पाहिला तर असे दिसते की ज्या वेगाने संसद आणि विधानसभांमध्ये कलंकित नेत्यांची उपस्थिती वाढत आहे, तो दिवस असा येईल की निष्कलंकांची यादी तयार करण्यात अडचणी येतील इतकी ती लांबलचक तयार होईल.

संसद आणि विधानसभेचे भवितव्य काय असेल, हे कोणालाच माहीत नाही. पण सध्याच्या सभागृहाची गोष्ट नीट वाचा आणि बघा की संसदीय राजकारणात महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ अद्याप मिळालेला नसला तरी सत्य हे आहे की छुप्या पद्धतीने सर्वच राजकीय पक्षांनी सभागृहात कलंकित नेत्यांना तिकीट देवून निवडून आणलेले आहेत .३३ टक्क्यांहून अधिक जागा कलंकित लोकांसाठी राखीव असतील, तर ८० टक्क्यांहून अधिक जागा श्रीमंत नेत्यांसाठीही राखीव आहेत. यात.सर्व सामान्य जनता कुठे असेल? या लोकांनी काय करायचे,?

देशातील संसद आणि विधानसभा कलंकित नेत्यांच्या आवाक्यामुळे आणि त्यांच्या कुप्रसिद्ध चारित्र्यामुळे कलंकित झाल्या आहेत.यात शंका नसली तरी संसदीय राजकारण करणाऱ्या अनेक नेत्यांवर मोठ्या प्रमाणात राजकीय गुन्हे दाखल झाले आहेत हेही तितकेच खरे आहे.

कधी विरोधी पक्ष विरुद्ध पक्षाच्या राजकारणाला कलंक लावण्यासाठी खोटे गुन्हे दाखल करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत, तर कधी त्याच पक्षाचे समांतर नेते समोरच्याच्या तुलनेत स्वतःला वरचढ ठरवण्यासाठी विरुद्धच्या नेत्यांना कलंक लावण्यात कसूर करत नाहीत. लोकशाहीचा हा खेळही हा सतत सुरू आहे. उदाहरणार्थ,कन्हैया कुमारचे उदाहरण देता येईल . देशविरोधी घोषणा दिल्याप्रकरणी कन्हैया कुमारवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला देशद्रोही म्हटले पण त्याच्या चेहऱ्यावर भारतविरोधी आणि देशद्रोहाचा डाग आहे, असे सांगायला विरोधी पक्ष कमी पडत नाहीत. संसदीय राजकारण करणाऱ्या बहुतांश नेत्यांवर काही ना काही गुन्हे दाखल आहेत.

या प्रकरणात सर्वाधिक खटले डाव्या पक्षांच्या नेत्यांवर आहेत. याचे कारण म्हणजे डाव्या पक्षांचे नेते लोकांच्या समस्या आणि हक्काच्या बाबतीत आघाडीवर असतात. ते सरकारच्या धोरणांना विरोध करतात आणि त्याचा परिणाम त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतो. अलीकडच्या काळात देशात अनेक ठिकाणी धर्म आणि जातीच्या नावावर खेळ खेळला जात असून त्यातही मोठ्या प्रमाणात नेत्यांवर गुन्हे दाखल होत आहेत. निवडणुकीच्या वेळी दिलेली भाषणेही अनेक नेत्यांविरुद्ध खटले भरण्याचे कारण बनतात. जनतेच्या मागण्यांमुळे खटल्यांचे बळी ठरणाऱ्या काँग्रेस, भाजप आणि अन्य पक्षांच्या नेत्यांचीही तीच अवस्था आहे.

विशेषतः देशाच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांचा विस्तार झाल्यापासून आणि राज्यांमध्ये त्यांची ताकद वाढल्याने राजकीय खटले वाढले आहेत.

किती टक्के नेते राजकीय खटल्यांना बळी पडतात याबाबत अद्याप स्पष्ट आराखडा नसला तरी, देशातील ३० ते ३५ टक्के नेते राजकीय षड्यंत्राचा भाग म्हणून खटल्यांमध्ये अडकले असल्याचे मानले जाते. नेते राजकीय षडयंत्राचे बळी ठरल्याची गोष्ट इथे पुढे करण्याची गरज नाही, पण नेते राजकीय खटल्यांचे बळी ठरतात हे निश्चित, पण राजकारणाचे गुन्हेगारीकरण वाढत चालले आहे हे मोठे सत्य आहे.

अशा स्थितीत प्रश्न पडतो की राजकारण हा खरोखरच गुंडांचा खेळ आहे का? लोकसभेपासून विधानसभेपर्यंत कलंकित नेत्यांची मुबलकता आहे, तर राज्यसभा आणि विधानपरिषदेवर करोडपती आणि धनाढ्य व्यावसायिकांचे वर्चस्व आहे.

कलंकित नेते आमच्यासाठी कायदे बनवत आहेत तर करोडपती नेते आमच्या आर्थिक विकासासाठी धोरणे बनवत आहेत. तो एक अप्रतिम देखावा आहे. याला लोकशाही म्हणायचे की कलंकित व्यवस्था किंवा धनदांडग्यांची व्यवस्था म्हणून म्हणायचे?. सत्य हे आहे की, सध्याचे राजकारण लोकशाहीची धींड काढत आहे आणि कलंकित श्रीमंत नेत्यांमुळे लोकशाही अपयशी ठरत आहे.

पूर्वीच्या काळी दरोडेखोरांच्या टोळ्या असायच्या. या टोळ्या गोर गरिबसह श्रीमंतांना टार्गेट लुटायचे. आताही तोच खेळ राजकारणाच्या जोरावर सुरू आहे. देशातील राजकीय पक्षांचे टोळ्यांमध्ये रूपांतर झाले आहे. देशात क्वचितच असा कोणताही पक्ष असेल जो आपला पक्ष पूर्णपणे स्वच्छ असल्याचा दावा करू शकेल. धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्या पक्षाने लोक आणि गुन्हेगारांनाही कलंकित केले आहे.




आजचे सत्य हे आहे की आपण लोकशाहीची कितीही स्तुती केली तरी गुंड आणि चोरी, खून, बलात्कार, फसवणूक आणि डकैतीचे आरोप असलेले गुंड भारताची लोकशाही छिन्नविछिन्न करत आहेत आणि लोकशाहीला कलंक लावत आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांवर नजर टाकली तर आपले बंद डोळे उघडतील.२०१९ मध्ये एकूण ५४२ खासदार निवडून आले आणि संसदेत पोहोचले. त्यापैकी २३३ खासदार कलंकित आढळले आहेत. याचा अर्थ सध्याच्या सभागृहातील सुमारे ४३ टक्के खासदारांवर कोणत्या ना कोणत्या गुन्ह्याचा आरोप आहे आणि त्यापैकी १५९ खासदारांवर गंभीर आरोप आहेत. त्यांच्यावर दरोडा, बलात्कार, खून आणि खुनाचा प्रयत्न असे आरोप आहेत. येथे हे देखील नमूद केले पाहिजे की सध्याच्या सभागृहात एनडीएचे.३५३ खासदार असल्याने भाजप आणि एनडीएकडे सर्वाधिक कलंकित खासदार आहेत हे उघड आहे. इतर पक्षांबद्दल काय बोलावे?

सध्याच्या लोकसभेत कलंकित नेत्यांची उपस्थिती पहिल्यांदाच निवडून आले असे असे नाही.तर २०१४ आणि २००९ च्या शेवटच्या निवडणुकांचा अभ्यास केला तर तीच गोष्ट दिसून येईल. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत १८५ कलंकित नेते निवडणूक जिंकून सभागृहात पोहोचले. त्यापैकी ११२ खासदारांवर खुनाचा आरोप आहे. त्यांच्यावर बलात्कार आणि खुनाचा प्रयत्न असे अनेक गंभीर आरोप होते. म्हणजे एकूण ३४ टक्के कलंकित नेते आपल्या लोकशाहीच्या.दावणीला बांधले गेले. २००९ च्या निवडणुकीत १६२ गुन्हेगारी प्रवृत्तीचे नेते निवडणूक जिंकण्यात यशस्वी झाले होते. त्यापैकी ७६ नेत्यांवर गंभीर आरोप होते. अशाप्रकारे, २००९ मध्ये कलंकित नेत्यांची टक्केवारी सुमारे ३० टक्के होती. अशाप्रकारे या तीन लोकसभा निवडणुकांवर नजर टाकल्यास लोकसभेतील कलंकितांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे स्पष्ट होते. २००९ मध्ये कलंकित लोकांची संख्या ३० टक्के असताना २०१४ च्या निवडणुकीत ती ३४ टक्क्यांवर गेली आणि २०१९ च्या निवडणुकीत ती विक्रमी पार करून ४३ टक्क्यांवर पोहोचली. अशा स्थितीत संसदेत कलंकितांसाठी सुमारे ३३ टक्के जागांचे आरक्षण लागू आहे, असेही म्हणता येईल. आजपर्यंत लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळू शकलेले नाही, पण सर्व पक्षांनी मूकपणे डागाळलेल्यांना ३३ टक्के आरक्षण निश्चित केले आहे. संसदेत करोडपतींचीही तीच अवस्था आहे. आता निवडणूक लढवणे सर्वसामान्यांच्या आवाक्यात राहिलेले नाही. लूट, दलाली, खंडणी व कथित धंद्याच्या नावाखाली अमाप संपत्ती असलेले श्रीमंत लोकच आता निवडणूक लढवू शकतात. संसदेत अशा नेत्यांची संख्या आता सातत्याने वाढत आहे. परिस्थिती अशी आहे की, पुढच्या निवडणुकीपर्यंत संपूर्ण सभागृह करोडपतींच्या हातात जाण्याची शक्यता आहे आणि सामान्य जनता फक्त तमाशा बघत राहील प्रत्येक बारीकसारीक गोष्टींवर लक्ष ठेवून राहील.पण काहीच करू शकणार नाही. २००९ च्या निवडणुकीत सभागृहात पोहोचलेल्या कोट्यधीशांची संख्या ३१५ होती, म्हणजे सुमारे ५८ टक्के खासदार कोट्यधीश होते. २०१४ च्या निवडणुकीत त्यांची संख्या ४४२पर्यंत वाढली, म्हणजे ८२ टक्के खासदार करोडपती होते. चालू २०१९ च्या निवडणुकीत ४७५ करोडपती खासदार सभागृहात पोहोचले, जे एकूण खासदारांच्या ८८ टक्के आहे. अशा परिस्थितीत करोडपतींसाठीही सभागृहात आरक्षण आहे. म्हणजे ८५ टक्के जागा करोडपती खासदारांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. लोकशाहीच्या या खेळाला काय म्हणाल?

केवळ लोकसभाच कलंकित नेत्यांनी भरलेली आहे असे नाही. राज्यांच्या विधानसभांची स्थिती पाहिली तर ती आणखी भीषण आहे आणि लोकशाहीच्या गुन्हेगारीकरणाला पुष्टी देते. यूपीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ४०३ पैकी २५५ कलंकित उमेदवार निवडणूक जिंकून विधानसभेत पोहोचले. या आमदारांवर अनेक प्रकारचे गंभीर गुन्हे आहेत. काहींवर बलात्काराचे तर काहींवर महिलांच्या छेडछाडीचे गुन्हे दाखल आहेत. काहींवर खुनाचा तर काहींवर खुनाच्या प्रयत्नाचा आरोप आहे. काहींवर दरोड्याचे तर काहींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. या निवडणुकीत भाजपला २५५ जागा मिळाल्या. भाजपच्या २५५ आमदारांपैकी १११ कलंकित आहेत, म्हणजे जवळपास निम्मे भाजपचे आमदार गुन्हेगार आहेत. सपाच्या १११ पैकी ७१ आमदार कलंकित आहेत. याशिवाय यावेळी यूपीच्या एकाच विधानसभेतील ३६६ आमदार कोट्यधीश आहेत. **क्रमशः**

# अच्छा तो हम चलते हैं, फिर कब मिलोगे

आधुनिक केसरी

**एखाद्या चित्रपटातील एखादे गीत किंवा प्रसंग (सीन) लिहिताना अथवा त्याचे चित्रीकरण करीत असताना किती परिश्रम घेतले गेले असतील आणि प्रयत्न केले असतील असा विचार तो चित्रपट पाहात असताना आपल्या मनात जराही डोकावत नाही. चित्रपटाचे संगीत किंवा त्यातील एखादे गीत आपल्याला आवडले तर आपण ते वारंवार गातो-गुणगुणतो. जर एखादे गीत आपल्याला आवडले नाही तर आपण ते अगदी सहजपणाने विसरूनही जातो. गतकाळातील एका लोकप्रिय चित्रपटातील एक सर्वाधिक लोकप्रिय गीत लिहिण्यापासून ते त्याच्या चित्रीकरणापर्यंतची कथा मनोरंजक आहे.**



गीतकाराने बरीच डोकेफोड केल्यानंतर त्याला त्या गीताचा मुखडा सापडला आणि त्याने संपूर्ण गीत अवघ्या २५ मिनिटांमधे लिहून हातावेगळे केले. परंतु केवळ २५ मिनिटांमधे लिहिल्या गेलेल्या त्या गीताचा मुखडा आणि अंतिम अंतऱ्याचे चित्रीकरण करण्यासाठी दिग्दर्शकाला तब्बल तीन दिवस लागले ! प्रख्यात निर्माते जे. ओमप्रकाश यांच्या १९७० साली प्रदर्शित झालेल्या `आन मिलो सजना' या चित्रपटाच्या निर्मितीकाळातील ही घटना आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मुकुल दत्त करीत होते. गीते आनंद बक्षी यांनी लिहिली होती आणि संगीताची जबाबदारी लक्ष्मीकांत-प्यारेलाल या अव्वल संगीतकार जोडीवर सोपविण्यात आली होती. चित्रपटातील एका प्रसंगानुसार एखादे प्रणयरम्य गीत ध्वनिमुद्रित केले जावे, अशी इच्छा या चित्रपटाचे नायक राजेश खन्ना यांनी व्यक्त केली होती. ती ऐकून जे. ओमप्रकाश यांनी संगीतकार लक्ष्मीकांत यांना प्रणयाने भरलेले गीत तयार करावयास सांगितले. यावर लक्ष्मीकांत यांनी ओमप्रकाश यांना असे सुचविले, की प्रथम आनंद बक्षी यांना गीत लिहू द्या; ते लिहून पूर्ण झाले की मगच आम्हाला त्याला चाल लावता येईल. त्यानंतर आनंद बक्षी यांनी त्या गीताचे अनेक मुखडे लिहिले आणि ते ओमप्रकाश यांना ऐकविण्यासाठी बक्षी ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत पोहोचले. पण मुखडे ऐकल्यावर ओमप्रकाश यांनी एका मागून एक सगळे मुखडे नाकारले. त्यांची ही बैठक सुमारे दहा तास चालू होती परंतु तरीही आनंद बक्षी यांना मुखडा न सुचल्याने ते सगळ्यांचा निरोप घेताना लक्ष्मीकांतना म्हणाले, अच्छा तो हम चलते हैं. (चला आता मी निघतो) त्यावर लक्ष्मीकांत यांनी त्यांना विचारले, फिर कब मिलोगे ? (पुन्हा केव्हा भेटाल?) त्या दोघांमधील हा संवाद ऐकताच जे. ओमप्रकाश यांनी अक्षरशः उडीच मारली आणि ते आनंदाने ओरडले...... मिळाला गीताचा मुखडा ! जे. ओमप्रकाश यांचे ते शब्द कानी पडताच आनंद बक्षी यांचे पाय जागच्याजागी थबकले आणि त्यांनी त्वरित माघारी येऊन `अच्छा तो हम चलते हैं...' हे गीत केवळ



२५ मिनिटांमधे लिहून दिले.

आनंद बक्षी यांनी या गीताचे अंतरे २५ मिनिटांत भलेही लिहिले ; पण गीताचा मुखडा आणि अंतिम अंतरा यांचे चित्रीकरण करण्यासाठी दिग्दर्शक मुकुल दत्त यांना तब्बल तीन दिवस लागले. मुखडा आणि अंतिम अंतरा यांचे चित्रीकरण श्रीनगरला केले जाणार होते. हे गीत नायक राजेश खन्ना आणि नायिका आशा पारेख या प्रणयी युगुलावर चित्रित करण्यात येणार होते. त्या चित्रीकरणासाठी चित्रपटाचा संपूर्ण संच (युनिट) मुंबईहून काश्मीरमधे दाखल झाला. केशभूषाकार महिलेने दीड-दोन तासांच्या परिश्रमांनंतर आशा पारेख यांची एक नवी केशरचना केली. त्यानंतर रंगभूषा-वेषभूषा आटोपल्यावर नायक-नायिका बाह्यचित्रीकरणासाठी सज्ज झाले. सूर्य जसजसा मावळतीकडे सरकू लागला तसतसे ते दोघे वाजणाऱ्या गीतावर ओठ समक्रमण (लिप सिंक) करून गीत गाऊ लागले. पण हे काय ? सूर्य मावळू नये म्हणून त्यांनी घाई केली आणि त्यात ते दोघे गीतातील स्वतःच्या ओळी विसरून दुसऱ्याच्या ओळींवर ओठ समक्रमण करू लागले ! नायकाच्या ओळींवर आशा पारेख गात होत्या तर नायिकेच्या ओळींवर राजेश खन्ना ! परंतु ही गोष्ट ते दोघे कलावंत, दिग्दर्शक आणि संपूर्ण संचाच्या लक्षात येईपर्यंत सूर्य मावळलाही ! कलावंतांच्या चुकीच्या ओठ समक्रमणामुळे या अंतऱ्याचे दुसऱ्या दिवशी पुन्हा चित्रीकरण करावे लागणार होते. दुसऱ्या दिवशीच्या चित्रीकरणाची तयारी झाली. नायिकेच्या केसांची पुन्हा तीच गुंतागुंतीची रचना करण्यात कालच्या इतकाच वेळ गेला आणि रंगभूषा पूर्ण होईपर्यंत सूर्यास्ताची वेळ जवळ जवळ येऊ लागली. या चारच ओळींच्या चित्रीकरणाच्या वेळी सूर्य पुन्हा मावळू नये या ओढाताणीत नायक-नायिका यांनी पुन्हा चूक केली आणि सूर्यास्त झाला. आता तिसरा दिवस उजाडला. दिवसभर प्रतीक्षा केल्यावर पुन्हा तीच चित्रीकरणाची तयारी ! नायक-नायिका यांचे रंगभूषाकार आणि केशभूषाकार यांनी त्यांना चित्रीकरणासाठी सज्ज केले. चित्रीकरण सुरू होण्यापूर्वी नायक राजेश खन्ना नायिका आशा पारेख यांना सावधगिरीची सूचना देताना म्हणाले, की हे बघा, आज तुम्ही माझी ओळ गाऊ नका ! त्यावर आशा पारेखही त्यांना म्हणाल्या, की तुम्हीही माझ्या ओळीऐवजी तुमची ओळच गा. अखेर मावळतीला चाललेल्या सूर्याच्या साक्षीने तिसऱ्या दिवशी या प्रणयप्रधान गीताचे चित्रीकरण सुरळीत पार पडले आणि चित्रपट प्रदर्शित झाल्यावर गीत सर्वाधिक लोकप्रियही बनले.


**अनिल रा. तोरणे**
तळेगाव दाभाडे, पुणे
९२२६१६०६५४


# जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, झालीच पाहिजे!




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**ओबीसी समाजाला मिळालेले आरक्षण हे सद्या धोक्यात आले असून ते पुढे रद्दी होऊ शकते. त्यामुळे काँग्रेसच्या वतीने ओबीसी समाजामध्ये जनजागृती करण्यात येत आहे. सरकार विरोधात आंदोलने करण्यात येत आहेत. महाराष्ट्रभरातील विविध ओबीसी संघटनाही सरकारच्या विरोधात पेटून उठू लागल्या आहेत. जिकडे तिकडे निषेध मोर्चे, संप, चक्काजाम, उपोषणे, आंदोलने होऊ लागले आहेत. अजब सरकारच्या गजब निर्णय- कारनाम्यांना जनता आता ठेचून काढून त्यांना- सरकारच्या कच्च्या बच्च्यांना त्यांची जागा आणि लायकी दाखवून देणार आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्टच! तसेच ओबीसींची जातनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे, अशी मागणी यातून करण्यात येत आहे, ती अगदी रास्तच आहे.**

प्रत्येक जिल्ह्यात ओबीसींसाठी स्वतंत्र वस्तीगृह निर्माण करावे व ते चालविण्यासाठी ओबीसीमधील सुशिक्षित बेकार लोकांना चालू करण्यास परवानगी द्यावी. महाज्योती ही ओबीसींसाठी चालू केलेली वित्तिय संस्था आहे. परंतु त्यासाठी पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर या ठिकाणी त्वरीत विभागीय कार्यालय चालू करण्यात यावे. परदेशी शिक्षणासाठी व इतर महत्त्वाच्या शैक्षणिक डिग्रीसाठी भरीव निधीची तरतूद करावी, याही मागण्या लावून धरण्यात येत आहेत.

बहुजनांसाठी व बलुतेदारांसाठी विविध महामंडळे स्थापन केले आहे. परंतु त्यांना पुरेसा निधी व पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे योजनांची अंमलबजावणी होत नाही. तसेच बलुतेदार महामंडळासाठी अडीच हजार कोटी रूपयाची तरतूद करून पुर्वी जे कर्ज काढले आहेत, ते सर्व पुर्णपणे माफ करून कोर्टातील केसेस काढुन घ्याव्यात. मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना आहे. त्यापध्दतीची ओबीसींसाठी स्वाधार योजना त्वरीत चालू करण्याचीही मागणी होत आहे. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण राज्यात आगामी काळात सत्यपाल मलिक यांच्या विविध शहरांमध्ये सभा घेतल्या जाणार आहेत यामध्ये छत्रपती संभाजी नगर पुणे शहरात घेतल्या जाणार असल्याची माहिती काँग्रेसच्या ओबीसी सेलचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे. घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत त्यांनी ओबीसींवर होणाऱ्या अन्यायाचा पाढाच वाचून दाखवला आहे, हे अभिनंदनीयच! त्यावेळी माळी म्हणाले होते, की सत्यपाल मलिक यांच्यासोबत माझे बोलणे झाले असून पुढच्या महिन्यात त्यांच्या सभा राज्यात घेण्यात येणार आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर, नाशिक, नागपूर, पुणे या ठिकाणी या सभा होणार आहेत यामधून मलिक हे केंद्र सरकारची पोलखोल करणार असल्याचे माळी यांनी म्हटले आहे. या अशा रोषांना सरकारला सामोरे जावे लागत आहे, रोष पत्करावा लागत आहे, तेव्हा सरकारने आपली थोडी थोडकी लाज वाचवून ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा.

देशातील ९० टक्के ओबीसी आणि मागासवर्गीय लोकसंख्येला खरोखरच न्याय द्यायचा असेल, तर देशातील ओबीसींसह सर्व जातींची जनगणना होणे गरजेचे आहे. या देशात धर्म आणि जातीच्या नावावर लोकांना भडकवले जात आहे. धर्माच्या नावावर दंगली घडवून आणल्या जात आहेत, शाळांकडे जाणारा जमाव धार्मिक उन्मादाकडे वळवला जात आहे. धर्माच्या नावाखाली काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये तरुणांना सहभागी करून, त्यांच्या हातातून पेन-वही काढून, त्यांना त्रिशूळ, तलवारी देऊन त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे. या देशाला शाळांची गरज आहे, मंदिरांची नाही. मंदिरापासून फक्त ब्राह्मणी पुजाऱ्यांना रोजगार मिळेल, परंतु बहुजन लोकांना त्यापासून काही एक लाभ नशीब होऊ शकत नाही. शाळेत शिकून देशसेवा म्हणून सरकारी नोकरीत तरी रूजू होईल. नोकरी लागल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. ओबीसींची परिस्थिती सुधारू नये म्हणून की काय? शैक्षणिक आणि नोकऱ्यातील आरक्षण संपवण्यात आले आहे. म्हणजे ब्राम्हण किती षडयंत्रकारी असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. म्हणून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत, "ब्राम्हीन्स हॅव अ ब्रेन वुईथ इन द ब्रेन..!" ब्राम्हणांच्या एका मेंदूत अनेक षडयंत्रकारी मेंदू लपलेले असतात. म्हणून तो सतत षडयंत्र रचत असतो. आजचे ब्राह्मणीमेंदूयुक्त सरकारही देश विकायला- देश बरबाद करायला निघाले आहे, वेगळे सांगावे लागू नयेच!

ओबीसींनी नाना देवांधर्मांच्या नादी लागून स्वतःचे वाटोळे केले आहे. कारण धर्म ही अफूची गोळी आहे. या धर्म नावाच्या अफूच्या गोळीची नशा चढली तर ती धोकादायक- विनाशक ठरते. म्हणून ओबीसींनी सावध होणे गरजेचे आहे. ज्या दिवशी ओबीसींची जातनिहाय जनगणना होईल, त्या दिवशी ओबीसी ब्राम्हणी गुलामीतून नक्कीच होईल. हे मी येथे जगजाहीरपणे लिहून देत आहे. कारण त्याला एससी, एसटीप्रमाणे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासन-प्रशासनात भागीदारी मिळू शकते आणि ओबीसींच्या जागांवर ब्राम्हणांनी जो कब्जा केला आहे; तो त्यांना सोडावा लागू शकतो. हीच भीती ब्राह्मणीमेंदूच्या शासकवर्गाला असल्याने तो ओबीसींची जातनिहाय जनगणना करू पहात नाही, तो प्राणप्रणाने विरोध करत असतो. एवढेच नाही तर ओबीसींच्या ऑक्सिजनवरच ब्राम्हणवाद जीवंत आहे. ज्यादिवशी ओबीसी ऑक्सिजन काढेल त्यादिवशी ब्राम्हणवादाचे त्याचबरोबर शासकवर्गाचेही रामनाम सत्य झाल्याशिवाय राहणार नाही, एवढे निश्चित आहे!

बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ओबीसी समाजाची वेगळी जनगणना करावी, अशी मागणी ओबीसी, एससी, एसटी सोशल फ्रंटच्या वतीने विभागीय आयुक्तांमार्फत पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याचे कारण काय असावे बरे? महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ओबीसी समाज आहे. जनगणनेत भरण्यात येणाऱ्या अर्जामध्ये अनेक रकाने असतात. यामध्ये एक रकाना वाढवून ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हायलाच हवी. इतर मागास वर्गासाठी योजना आखायच्या असतील, विविध कार्यक्रम राबवायचे असतील तर त्या संदर्भात ओबीसी जनगणना होणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या चार मार्च २०२१च्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले आहे. परिणामी ओबीसी, एससी, एसटी समाजामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाने मागविलेली वस्तुनिष्ठ माहिती- इम्पिरिकल डाटा तयार करण्यास व ओबीसींची निश्चित आकडेवारी काढण्यासाठी जातनिहाय जनगणने केल्यास अधिकच सोयीचे होईल, असा दावाही त्यांनी करत महाराष्ट्र राज्याने बिहारच्या धर्तीवर राज्यातील ओबीसींची स्वतंत्र जनगणना करावी, केंद्र सरकारने ओबीसींची घरोघरी जाऊन शिरगणती करावी अशी मागणी केली. यासह सार्वजनिक उपक्रमांचे खासगीकरण व विक्री करण्यात येऊ नये, पदोन्नतीतील आरक्षण लागू करण्यात यावे, ओबीसींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा देण्यात याव्यात. रिक्त जागांचा अनुषेश तत्काळ भरण्यात यावा, महाराष्ट्रात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होऊ नयेत, येणाऱ्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशीही मागणी ओबीसी, एससी, एसटी सोशल फ्रंटच्या वतीने करण्यात आली आहे. याच मागणीसाठी पुढे पुढे तर आणखीच मोठ्या संख्येत सरकारी कचेऱ्यांवर "हल्लाबोल" होईल, सरकारने आपली लाज मूठीत घट्ट आवळून सज्ज असावे.



सरकारने गडचिरोलीसारख्या मागास जिल्ह्यांच्या विकासाच्या उद्देशाने पेसा कायदा अमलात आणला. शासनाच्या मते त्या भागात फक्त आणि फक्त आदिवासी समाजच वास्तव्यास आहे. तेथे इतर मागासवर्ग नाही. अशी बिनडोक समज शासनाच्या धुरीनांची होत असावी, असे वाटते. त्याअंतर्गत विविध विकासयोजना राबवताना अथवा नोकरभरती करताना केवळ एसटी प्रवर्गातीलच उमेदवार घेतले जातात. लायक उमेदवार प्राप्त न झाल्यास ते पद दीर्घ कालावधीसाठी तसेच रिक्त ठेवले जाते. मागास भागात अशीच अनेक पदे रिक्त राहिल्याने त्याचा विकास होणे शक्य आहे काहो? प्रथम प्राधान्य आदिवासी वर्गास बहाल करून नंतर रिक्त पदांवर तेथीलच स्थानिक इतर प्रवर्गातील उमेदवारांना संधी देण्यात आल्यास यथायोग्य विकास साधने शक्य होईल, असे माझे प्रांजळ मत आहे. येथील आदिवासी बांधवांचे याबाबत मत जाणून घेतले असता, तेही त्यांच्या पश्चात इतर मागास वर्गातील उमेदवारांची वर्णी लावून विकास साधला जावा, याच मताचे समर्थन करताना दिसतील. कारण एक मागास वर्ग हा दुसऱ्या मागास वर्गावर अवलंबून आहे, एकमेकांना सहायक आहे, हेच यावरून सिद्ध होते. म्हणूनच सरकारने तात्काळ ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यासंदर्भात निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. ओबीसींची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, झालीच पाहिजे!

# जे पेराल... तेच उगवेल



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**आयुष्य किती सुंदर आहे. फक्त प्रत्येकाला जगता आलं पाहिजे. प्रत्येक जीवाला असं वाटतं माझं आयुष्य आनंदी असावं, माझी सर्व स्वप्ने पूर्ण व्हावीत, जगातील सर्व सुखे माझ्या पायाशी लोळण घेत राहावी. असं वाटतं त्यात गैर काहीच नाही. जन्म घ्यावा लागे वासनेच्या संगे हे जे संतांनी सांगितलं आहे तेच मानवी जीवनाचे सत्य आहे. जीवन जगत असताना इच्छा निर्माण होते आणि प्रपंचाच रहाट गाडगं सुरू होतं. माणसाचं त्या इच्छेच्या मागे धावणं सुरू होतं आणि सुरू होतो तो जीवन प्रवास...आयुष्य जगत असताना, सुखाच्या मागे धावताना आपण आपल्या अवती भोवती असणारा आनंद हरवत जात आहोत याचे भानच उरलेलं नाही.**

आनंद स्वतः पासून सुरू होतो आणि स्वतः जवळच येऊन थांबतो याचा विसर पडल्याने मानवी जीव दुःख भोगत आहे. म्हणजेच काय, मला असे वाटते माझ्या मुलाने माझी सेवा करावी, माझं सर्व ऐकावं त्यावेळी एक क्षणभर विचार जरूर करावा की, मी माझ्या वडिलांची सेवा करतो का? माझ्या वडिलांचं मी सर्व ऐकतो का? उत्तर होय असेल तर जगातील कोणताच व्यक्ती तुम्हाला दुःख देण्यास समर्थ नाही. पण उत्तर जर नाही असेल तर जगातील कोणतीच गोष्ट तुम्हाला सुख ही द्यायला समर्थ नाही. मी जर एक स्त्री असेल आणि मी माझं सासरचं कुटुंब आनंदाने सांभाळत असेल तर माझ्या मुलीला संसार करताना वेगळं असं नाही सांगावं लागणार की, सासरच्यांना जप, त्यांची काळजी घे म्हणून. कारण तिने लहानाचे मोठं होताना पाहिलं असेल की आईने तिच्या आजी आजोबा यांची कशी काळजी घेतली. बऱ्याच वेळा असं चित्र पाहायला मिळतं की, मी माझ्या सासू सासऱ्यांचे, नंदा बाळांचे करणार नाही, पण माझ्या आई वडिलांचे सर्व काही झाले पाहिजे. नणंद म्हणून माझे सर्व केले पाहिजे. 'दे रे हरी खटल्यावरी ' कसं काय शक्य आहे म्हणूनच म्हणतात जे पेराल तेच उगवेल. मग मी पेरतानाच विचार करायचा की, मला काय पेरायचं आहे. सेवा पेरली तर सेवाच मिळणार आहे. लबाडी केली तर दुःखच मिळणार आहे. सर्वांना व्यक्ती आणि विचार स्वातंत्र्य आहे पण याचा अर्थ असा नाही की आपण आपली संस्कृती जपणं सोडून द्यावं. आपल्याच नात्यांना प्रेमाचा ओलावा व मायेची ऊब देऊन जपावं म्हणजेच येणारी पिढी अशीच नात्यांची घट्ट वीण बांधत जाईल. संत कबीर म्हणतात,"पेड बबुल का लगावे, तो आम कहाँ से पावे" मानवच यंत्रवत झाला आहे त्याच्याकडे स्वतःला द्यायला वेळ नाही मग तो एवढं सगळं कधी करणार ...पण जेव्हा ह्याच यंत्रवत मानवाची उतरती कळा सुरू होते, कामाचा व्याप थोडा कमी होतो, हात पाय थकल्यासारखे होतात तेंव्हा जाणवते माझी मुलं माझ्या जवळ हवीत, माझी नातवंड माझ्या जवळ हवीत हा स्वर्ग सुखाचा आनंद मला मिळायला हवा. पण तेंव्हा वेळ फुलपाखरासारखी हातातून निसटून गेलेली असते. तेंव्हा चिंतन होतं हे जर मी केलं असतं, कामांना थोडं कमी महत्व दिलं असतं आणि कुटुंब जपलं असतं तर ही कातरवेळ जीवघेणी वाटली नसती. जो पर्यंत शरीरात रग शिल्लक आहे तो पर्यंतच थांबायला शिकले पाहिजे. नाहीतर आपण किती बातम्या वाचतो की, सुप्रसिद्ध डॉक्टर यांचे वृद्धाश्रमात बेवारस निधन, प्रसिद्ध उद्योगपती रस्त्यावर कंगाल अवस्थेत फिरताना दिसले. उत्तम कलाकार यांचे निधन झाले 2 दिवस कोणालाच माहीत नाही, एकेकाळची आदर्श शिक्षिका रस्त्यावर भीक मागताना दिसली ... कटू



आहे पण हेच सत्य आहे. कारण मुलांना आपणच व्यावहारिक बनवलं, परदेश वारीचं स्वप्न आपणच मनी बाळगलं, आधुनिकतेच्या नावाखाली आपणच भरकटलो... मग ते ही त्यांच्या स्वप्नाच्या मागे धावतात यात त्यांचं चुकलं काय? याचा अर्थ असा नाही की, मुलांच्या पंखांना बळ नाही द्यायचं, त्यांना परदेशी नाही पाठवायचं. घेऊ द्या की गगन भरारी, आभाळ ठेंगणे होईल एवढं यश मिळूद्यात की त्यांना. फक्त सायंकाळ व्हायच्या आत जशी सर्व पाखरे घराकडे वळतात तसं त्यांनाही माघारी परतवायला शिकवलं पाहिजे. यशाच्या मागे धावताना कुठे आणि कधी थांबायचं हे शिकवायचं असेल तर आधी आपल्याला थांबता आलं पाहिजे. आपण लाख जगाला ओरडून सांगू मी किती कष्ट केलं, मी किती कुटुंबाची काळजी घेतली पण स्वतःच अंतर्मन सतत जागं असतं आणि ते ग्वाही देत असतं. म्हणून म्हणतात आपण जगाला फसवू शकतो पण स्वतःला नाही. मी जीवन जगताना मला माझी नोकरी आणि मुलं एवढंच प्रिय असेल तर माझ्या मुलांनाही त्यांची नोकरी आणि त्यांची मुलंच प्रिय असणार आहेत.

जेंव्हा आपण सेवा करतो त्याच वेळी आपली सेवा करण्यासाठीची तयारी सुरू असते. म्हणून आपण आधी द्यायला शिकलं पाहिजे. कारण देतो तोच देव आणि फक्त घेतो तो दानव. बऱ्याच लोकांना असं म्हणतानाही ऐकलं आहे, आम्हाला नाही लागत कोणी, आम्ही स्वतंत्र विचार सरणीचे आहोत. आम्ही स्वावलंबी आहोत मुलांनी त्यांचं त्यांचं पहावं. हे सर्व विचार टिकतात ते वयाच्या एका टप्प्यापर्यंतच नंतर मात्र वेध सुरू होतात कोण भेटायला येईल काय? दोन शब्द प्रेमाने बोलेल काय? पण हे असं घडत नाही कारण तारुण्यातील मोडेन पण वाकणार नाही चा रुबाब. स्वावलंबी पणाचा खोटा मुखवटा गळून पडलेला असतो उरतं ते फक्त अपराधी पणाचं जिणं. आजही बऱ्याच ठिकाणी चित्र पाहायला मिळतं की, आजी आजोबा दोघेच राहतात. कामवाली येते स्वयंपाक व सर्व कामे करून जाते. दिवसभर हे दोघेचं. आजोबांच्या तोंडातून शब्द फुटत नाही व आजीला जास्त ऐकू येत नाही कसा घडणार संवाद? कसा मिळणार आनंद? एक एक दिवस वर्षासारखा मोजताना त्यांना बघितलं आहे. म्हणून पैसा आणि व्यवहार चातुर्य जपण्यापेक्षा माणसं जपुयात पुढच्या पिढीला आधी केले, मग सांगितले असा वारसा जतन करून देऊयात म्हणजे आयुष्याच्या संध्याकाळी कुटुंबातील गोकुळात आनंदाने या जगाचा निरोप घेता येईल.



# राजपूत समाज आक्रमक, मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन पाळले नाही

## राजपूत समाजाच्या तोंडाला पुसली शिंदे सरकारने पाने

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** येथे १४ मे रोजी झालेल्या वीर महाराणा प्रतापसिंह महासंमेलनात समस्त राजपूत समाजाने जातवैधता प्रमाणपत्रासह इतर मागण्या केल्या. त्याबाबत संरक्षणमंत्री राजनाथसिंह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या पूर्ण करण्याचे समाजाला आश्वासन दिले. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन न पाळल्याचा आरोप करत राजपूत समाज आक्रमक झाला आहे. प्रतिनिधींनी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत बेमुदत उपोषण करण्याचा इशारा शिवाजी शंकरसिंग पाटील सेवानिवृत्त उपकार्यकारी अभियंता दहिगांव संत यांनी दिला आहे.

सोमवारपासून जळगाव जिल्हाधिकारी महाराष्ट्र राज्य समस्त राजपूत समाजातर्फे गिरीश परदेशी हे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या समर्थनार्थ दरबारसिंह गिरासे, शाम राजपूत, सज्जनसिंह पवार, आनंदसिंह ठोके, विनोद पवार, चरणसिंग पाटील यांच्यासह राजपूत समाज बांधव आंदोलनात सहभागी झाले आहेत. संभाजीनगर येथे महासंमेलनात राजपूत समाज त्यांच्या मागण्या मांडल्या, त्यांनी घोषणा होऊन पंधरा दिवसांच्या आत निर्णय घेण्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आश्वासित केले होते. त्यानुसार मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली २६ जुलै रोजी लोकप्रतिनिधी व राजपूत समाजाच्या प्रमुख प्रतिनिधींची बैठक झाली. बैठकीचे इतिवृत्त अवगत करुन पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. मात्र, आजपर्यंत शासनाकडून मागण्यांसंदर्भात कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप उपोषणकर्ते गिरीश परदेशी यांनी केला आहे. मागण्या मान्य न झाल्याने राजपूत समाज आक्रमक झाला असल्याचे चित्र समोर येते आहे. उपोषणाला पाठींबा देण्यासाठी संभाजीनगर, धुळे, नंदुरबार व इतर जिल्ह्यातील समाज बांधव जळगावात आले आहेत. मागण्या मान्य न झाल्यास राज्यभरातील राजपूत समाजाचे हे आंदोलन केंद्रबिंदू ठरणार असल्याचेही परदेशी यांनी सांगितले मागण्यांसाठी पूर्तता होईपर्यंत लढा देणार राजपूत भामटा, परदेशी भामटा या जातीस जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सुरळीतपणे देण्यात यावे.महाराणा प्रतापसिंह यांची जयंती दिनी ९ मे रोजी जन्मतिथीनुसार साजरी करावी. या दिवशी सार्वजनिक सुटी जाहीर करावी. महाराणा प्रतापसिंह यांच्या कार्याचा उच्च शिक्षणापर्यंतच्या अभ्यासक्रमात समावेश करावा. भारत सरकारने घुमंतु, अर्धघुमंतू यावे, वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करावी. भटक्या विमुक्त जमातीच्या अभ्यासासाठी नियुक्त केलेल्या बाळकृष्ण रेणके व दादा विधाते आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू कराव्या. आदी मागण्यांची पूर्तता करण्याचा इशारा गिरीश परदेशी, शंकर शंकरसिंग पाटील सेवानिवृत्त उपकार्यकारी अभियंता दहिगांव संत, मोहनसिंग पवार सर चाळीसगाव, भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत सोयगाव व राजपूत बांधवांनी दिला आहे.

# गायखेड ग्रा.पं.मध्ये लाखोंचा भ्रष्टाचार!

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** मौजे गायखेड ता. लोणार येथील ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामांमधे झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींकडुन अपहाराची रक्कम वसुल करण्यासोबतच फौजदारी गुन्हे दाखल करा व भ्रष्टाचार्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करा अशा मागणीची तक्रार लोणार तालुका माहीती अधिकार कार्यकर्ता महासंघ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. बुलढाणा यांच्याकडे केली आहे.

गेल्या सहा महिन्या पासून गायखेड ग्रामपंचायत अंतर्गत विविध विकास कामांमधे भ्रष्टाचार झाल्याबाबत मा. गटविकास अधिकारी पं. स. लोणार यांना तक्रारी द्वारे वेळोवेळी निदर्शनास आणुन देण्याचा प्रयत्न तक्रारदार यांनी केला. सदर तक्रारीवर वेळेत कारवाई न झाल्यामुळे स्मरण पत्र सुद्धा देण्यात आले. टाळाटाळ करत तिन-चार महिन्यानंतर चौकशी झाली परंतु चौकशी अहवालावरून चौकशी अधिकारीच भ्रष्टाचार करणाऱ्यांना अभय देत आहेत असा आरोप करत माहीती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे लोणार तालुका अध्यक्ष शिवाजी घायाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. यांच्याकडे तक्रार केली आहे.

सदर तक्रारीमधे पंधरावा वित्त आयोगातील निधीतून झालेले RO फिल्टर, स्मशान भुमी बैठक व्यवस्था, स्मशान भुमी परिसरात पेव्हर ब्लॉक बसविने आणि स्मशान भुमी परिसरात संरक्षण भिंत व व्यवस्थापन या चार कामांचा समावेश आहे.

वरील कामांमधे काही कामे ही निकृष्ट दर्जाची झालेले आहेत तर काही कामे ईस्टिमेट नुसार झालेले नाहीत तर कही कामे अपुर्ण असतांनाच पैसे काढलेले आहेत तर काही कामेच झालेले नाहीत असा आरोप तक्रारीमधे केलेला आहे.

वरिल सर्व कामांसोबतच मागील पाच वर्षांत केलेल्या खर्चाची देखील चौकशी करून भ्रष्टाचार करणारावर कडक कारवाई करावी अन्यथा माहीती अधिकार कार्यकर्ता महासंघ यांच्या वतीने जनआंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आता जिल्हापरिषदेकडुन योग्य ती कारवाई केली जाते की तक्रारकर्त्यांना आंदोलनाचा पर्याय निवडावा लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# कुतुबखेडा येथे डॉ. प्रतिभा हजारे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** कुतुबखेडा येथील डॉ. प्रतिभा रामेश्वर हजारे यांनी नुकतेच एम.डी. परीक्षेत यश मिळविले आहे. या यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने डॉ. प्रतिभा हजारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त वन परिमंडळ अधिकारी सुखदेव हजारे, रेणुकादेवी शरद साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन नंदकुमार पठाडे, बाजार समितीचे संचालक परसराम हजारे, भगवान कारके, डॉ. मनोज नाटकर, अनिल हजारे, राजू हजारे, विकास हजारे, कर्डिले आदी उपस्थित होते. तर प्रा.युवराज औटे, सेवा निवृत्त प्रा.डमाळ सर यांनी अभिनंदन केले.

# उद्या, परवा मुंबई (एलटीटी)–नागपूर विशेष गाडी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबई ते नागपूर विशेष शुल्कावर दोन विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस – नागपूर विशेष गाडी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ७ ऑक्टोबर (शनिवार) आणि ८ ऑक्टोबरला (रविवार) रात्री १० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १.१० वाजता नागपूरला पोहोचेल. ही गाडी ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव, पुलगाव आणि वर्धा येथे थांबेल. या गाडीला १८ डबे असतील. यामध्ये – एक द्वितीय वातानुकूलित, तीन तृतीय वातानुकूलित, सात शयनयान आणि सात सामान्य द्वितीय श्रेणींचे सामानसह गार्ड ब्रेक व्हॅनचा समावेश आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# माजी मंत्री स्व. सुभाषराव झनक हे जनमानसातील लोकनेते होते

## अमोल नरवाडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**अंकुश खरात**

**रिसोड :** मनुष्य स्वभावाचे अचूक निदान, प्रेमाने माणसे संभाळण्याची कला व प्रसंगी शत्रूलाही नामोहरम करण्याचे कौशल्य. या त्रिसूत्रीच्या बळावर जिल्ह्याच्या विकासात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवणारे लोकसेवक राज्याचे माजी मंत्री स्वर्गीय सुभाषराव झनक हे जनमानसातील लोकनेते होते. असे प्रतिपादन अमोल नरवाडे यांनी केले आहे. रिसोड, मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी युवक काँग्रेस अध्यक्ष नरवाडे हे ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या स्व. सुभाषराव झनक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. पुढे बोलताना नरवाडे म्हणाले की, माजी मंत्री लोकनेते स्व. सुभाषराव झनक हे नाव वाशीम जिल्ह्यासह, संपूर्ण महाराष्ट्राला सुपरीचीत आहे. सामान्य माणसांच्या, कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या व्यथा वेदना जाणून, त्यांच्या न्याय हक्कांसाठी झटणारा तत्वनिष्ठ, परखड विचारांचा जनमानसातील लोकनेता म्हणून आजही ते प्रत्येकाच्या हृदयात जिवंत आहेत. स्व. सुभाषराव झनक साहेब रिसोडला येणार..! म्हटलं की, रस्ते गर्दीने



तुडुंब भरायचे. कारण त्यांचे विचार परखड होते. दिलेला शब्द पाळणारे होते. त्यांच्या सुभाष्यवाणीतून शब्दांची किमया पहावयास मिळत होती. अशा लोकनेत्याची लोकप्रियता शब्दात सांगणे खूप अवघड आहे. पण, आज त्यांच्या जयंती दिनानिमित्ताने हृदयात आलेल्या त्यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांच्या चरणी विनम्र अभिवादन करत असल्याचे अमोल नरवाडे म्हणाले. यानिमित्त सुभाषराव झनक चौक रिसोड येथील, स्व. झनक साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी नगर परिषदेचे माजी सभापती श्री कपिल पाटील कदम, माजी ग्रामसेवक अशोकराव जोगी, श्री अंकुश खरात, श्री अरविंद देशमुख, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ राऊत, गजाननराव निखाते, कोयाळी येथील सरपंच विनोद जाधव, निजामपूरचे योगेश जाधव, नितीन खोडके, महेंद्र भगत, रोहित पाटील दांदडे, आश्विन तुरुकमाने, अमोल गरकळ, पांडुजी गुंजकर, रामा पंडित, आदीसह बळीराजा मित्र मंडळ व दयावान ग्रुप रिसोडचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# दीड कोटी खर्चाच्या नवीन डांबरी रस्त्यावर उगवली झाडी ?

## पैठणच्या संत ज्ञानेश्वर उद्यानातील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जगप्रसिद्ध पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरात दोन महिन्यांपूर्वी नव्याने झालेल्या रस्ता डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून या डांबरी रस्त्यावर विविध प्रकारचे झाडे उगवल्याने या रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दिड कोटींच्या या डांबरी रस्त्याचे काम निकृष्ट पध्दतीने झाले असून या रस्त्याच्या कामाची थर्ड पार्टीकडुन चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दत्ता गोर्डे यांनी केली आहे. गुरुवारी दत्ता गोर्डे यांनी संत ज्ञानेश्वर उद्यानात जाऊन प्रत्यक्ष डांबरीकरण झालेल्या रस्ताची पाहणी केली.नव्याने तयार झालेल्या डांबरीकरण रस्ता अक्षरशः हाताने उखडला जात आहे. रस्त्यावर आंबा, करंज, हरळ, गवत, अशी झाडे उगवली आहे. चार महिन्यांपूर्वी संत ज्ञानेश्वर उद्यान विकासासाठी नऊ कोटी चा निधी मंजुर झाला होता. यामध्ये उद्यान परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्यासाठी दिड कोटी मंजूर करण्यात आले होते. या कामाची निविदा प्रक्रिया झाल्यानंतर संबंधित गुत्तेदाराने दिड कोटी चा हा रस्ता आठ दिवसांत पुर्ण केला. या रस्ता बोगस कामाचे पितळ उघडे पडु नये म्हणून पाटबंधारे विभाग अधिकाऱ्यांनी चक्क उद्यान प्रवेशद्वाराला कुलूप लावले. या गुत्तेदाराला पालक मंत्री संदीपान भुमरे यांचे अभय असल्याचे बोलले जाते. गुत्तेदाराने रस्त्याचे काम बोगस आणि निकृष्ट केले असल्याचा आरोप दत्ता गोर्डे यांनी केला आहे.

# स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये वन्यजीव सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसो येथे प्राणीशास्त्र विभाग यांच्या विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीव सप्ताह दि. ०२ ऑक्टोबर ते ०८ऑक्टोबर २०२३ साजरा करण्यात आला. प्रास्ताविकेतून डॉ. रवी खाडे प्राणीशास्त्र विभाग प्रमुख यांनी वन्यजीव सप्ताह हा आपल्या महाविद्यालयामध्ये दरवर्षी साजरा करण्यात येत असल्याचे सांगून,त्यामागचा मूळ उद्देश प्राण्यांचे जतन व संवर्धन करणे आहे. व त्याच निमित्ताने सप्ताह साजरा केला जातो असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.एम. एन गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी वन्यजीव जतन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावयात. तसेच वन्यजीव सप्ताहाचे महत्त्व जाणून घ्यावे असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित असलेल्या डॉ.रंजळकर सर वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख यांनी वन्यजीवांचे महत्व, प्राण्यांची संख्या कमी होण्याचे कारण, प्राणी संरक्षण ठेवण्यासाठी उपाययोजना याविषयी विस्तृतपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.शिल्पा जाधव तर आभार प्रदर्शन डॉ. छाया खिल्लारे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# सुभाष रिंढे यांची जेहुर विभाग प्रमुखपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील जेहुर औराळा विभाग प्रमुखपदी सुभाष रिंढे यांची निवड करण्यात आली आहे. सध्या कन्नड मध्ये शिंदे गटाचा प्रभाव टिकुन राहण्यासाठी शिंदे गटात दिग्जांची इनकमींग सुरू आहे. त्यातच जेहुर गटाचे माजी पंचायत समिती सदस्या रिंढेताई यांचे सुपुत्र सुभाष रिंढे यांना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख भरतसिंग राजपुत यांनी नियुक्ती दिल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पक्ष मजबुती करण्यासाठी राजपुत यांनी रिंढे यांना शुभेच्छा दिल्या.

# सिप्ला कंपनीत भारतीय मजदूर संघाने केला 15800 रुपये वेतनवाढीचा करार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सिप्ला कंपनीच्या पाताळगंगा, तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील कारखाना काम करणाऱ्या कामगारांच्या वेतन वाढीचा करार भारतीय मजदूर संघ प्रणित महाराष्ट्र राज्य औद्योगिक कामगार महासंघ आणि सिप्ला कंपनी यांच्यात नुकताच संपन्न झाला. या कराराद्वारे कामगारांना रुपये 15800/- एवढी वाढ दरमहा मिळणार आहे. यापैकी 50 टक्के रक्कम ही मूळ वेतन आणि अन्य रक्कम विविध भत्त्यांमध्ये दिली जाईल. कराराचा कालावधी एप्रिल 2023 पासून तीन वर्षांचा राहील.कंपनीच्या वतीने एचआर हेड अनिरुद्ध कुंटे, प्लांट हेड पराग देशमुख, एच आर मॅनेजर विनायक काळे, वेदराज यासह युनियनच्यावतीने जनरल सेक्रेटरी ॲड.अनिल ढुमणे, अशोक निकम , दामोदर जोशी, महादेव कचरे, बागडे पाटील, संजय लाड, गणेश आंबवणे, रवींद्र वळंजू, अनिल जाधव यांनी करारावर सह्या केल्या. यावेळी भारतीय मजदुर संघ रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष सुरेश पाटील उपस्थित होते. सदरचा करार हा विक्रमी वेळेत म्हणजे केवळ चार महिन्यात संपन्न झाला. त्याबद्दल संघटनेच्या वतीने व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले. या करारामुळे कामगारांचे वेतन बासष्ट हजारच्या पुढे जाणार आहे. करार झाल्यानंतर कारखान्यातील सर्व कामगारांनी कंपनीच्या सर्व अधिकाऱ्यांचा सत्कार केला. पेढे वाटून कारखाना गेटवर अन्य कारखान्यातील कामगारांसह आनंद उत्सव साजरा केला.





# स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात अमृतवाटिकेची निर्मिती

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** स्थानिक रिसोड येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमृतवाटिका वृक्षारोपण मोहिमेचे उद्घाटन प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांच्या शुभहस्ते वृक्ष लागवड करून करण्यात आले. 'मेरी माटी मेरा देश' या अभियाना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती प्रास्ताविकेतून प्रा.केशव कोकाटे यांनी दिली. निसर्गाचा, पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये वृक्षांची अतिशय मोलाची भूमिका असल्याचे मत प्राचार्यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमासाठी डॉ. के.एम. रंजळकर,डॉ.आदिनाथ बदर, डॉ.प्रवीण हाडे यांची उपस्थिती होती. दिनांक २५ ऑगस्ट २०२३ च्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे 'मेरी माटी मेरा देश' या कार्यक्रमांतर्गत दिनांक ०१ ते १३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये प्रत्येक महाविद्यालयामध्ये ७५ रोपांची अमृत वाटिका तयार करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने अमृतवाटिकेची निर्मिती केली. सदर मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.केशव कोकाटे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.एम.रंजळकर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यावेळी परिसरात पर्यावरण पूरक अशा ७५ वृक्षांच्या रोपट्यांची लागवड करून अमृत वाटिका तयार करण्यात आली. त्यामध्ये आवळा, वड, पिंपळ, बदाम,कदंब,यासह विविध वृक्षांचे रोपण प्राध्यापक,स्वयंसेवक-सेविकांनी केले. महाविद्यालयातील १५० विद्यार्थ्यांनी या मोहिमेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी रासेयोच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉ.आम्रपाली भगत, सह कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल अढाव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, प्राध्यापिका , शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते.

# २२ जणांना वीज चोरीप्रकरणी पाच लाखांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** महावितरणच्या आर्णी उपविभागाने चिखली आणि देउरवाडी येथील २२ जणांवर वीज चोरीची कारवाई करत ५ लाख २१ हजार रुपयाचा दंड ठोठावला आहे.वीज चोरी प्रकरणी दंड आणि वीज चोरीची रक्कम न भरल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता राजेंद्र राऊत यांनी दिली आहे.

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177


# सरकारने ओबीसींना शैक्षणिक, आर्थिक प्रगतीचा मार्ग दाखविला

## भाजपा ओबीसी जागर मेळाव्यात हंसराज अहीर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशातील सर्वात मोठ्या ओबीसी समुदायाच्या सामाजिक, शैक्षणिक आर्थिक व व्यावसायीक विकासाला खड्ड्यात लोटण्याचे काम गेल्या 60 वर्षात झाले. भाजपाची नियत साफ असल्याने सर्वांची साथ व सर्वांचा विकास या भूमिकेतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात पहिल्यांदाच ओबीसींच्या उत्थानाचे, सर्वांगिन विकासाचे कार्य केले. ओबीसींकरीता अनेक कल्याणकारी योजना राबवित त्यांचे मागासलेपण दूर सारून त्यांना शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात प्रगतीचा मार्ग दाखवित राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे महान कार्य भाजपा सरकार व मोदीजींच्या राजवटीत झाले असल्याने भाजपा हा पक्षच खऱ्या अर्थाने ओबीसींचा तारणहार असून ओबीसी बांधवांनी काळाची पाऊले ओळखून भाजपाची सोबत करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी केले. भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतिने ओबीसी संपर्क अभियानाअंतर्गत महात्मा गांधी जयंती दिनी (2 ऑक्टों.) सुरू झालेल्या ओबीसी जागर यात्रेचे चंद्रपूरात आगमन झाल्यानंतर महानगर ओबीसी मोर्चाच्या वतिने दि. 5 ऑक्टोंबर रोजी तुकूम येथील महेश भवनात आयोजित ओबीसी जागर महामेळाव्याला अहीर संबोधित होते. या ओबीसी जागर मेळाव्यास भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी डॉ. आशिष देशमुख, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जिवतोडे, प्रदेश महिला महासचिव अर्चना डेहनकर, प्रदेश उपाध्यक्ष सोनटक्के, रविंद्र चव्हाण, डॉ. प्रविण येनूरकर, रविंद्र उदासे, निलेश गुळधे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, ज्येष्ठ नेते विजय राऊत, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर अध्यक्ष राहुल पावडे, प्रदेश महिला मोर्चा च्या महामंत्री अल्का आत्राम, माजी आमदारव्दय संजय धोटे, सुदर्शन निमकर, खुशाल बोंडे, अनिल फुलझेले, ब्रिजभुषण पाझारे, रघुवीर अहीर, रमेश राजुरकर, नामदेव डाहुले, विवेक बोढे, विशाल निंबाळकर, विनोद शेरकी, वंदना संतोषवार, प्रभुती व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी सदर जागर यात्रा बाईक रॅलीने शासकीय विश्रामगृह पासून ते कार्यक्रम स्थळापर्यंत कुच करीत सभास्थळी आली.




या मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना हंसराज अहीर म्हणाले की, देशात अनिर्बंध सत्ता उपभोगणाऱ्यांनी ओबीसींच्या हिताचे धोरण कधीही स्वीकारले नाही. काका कालेलकर, आयोग असो की, मंडल आयोग असो शिफारसी स्विकारल्या नाहीत त्यासाठी व्हि. पी. सिंह यांचे भाजपासोबत सरकार यावे लागले. 1993 मध्ये ओबीसी आयोग स्थापन झाले मात्र आयोगाला संवैधानिक दर्जा मिळण्यासाठी मोदीजींचे सरकार यावे लागले. आज मोदीजींच्या राजवटीत ओबीसींना वैद्यकीय, इंजिनियरींग व उच्च शिक्षणात आरक्षण मिळत आहे. या पुर्वी एससी, एसटी बांधवांना संवैधानिक अधिकार मिळायचा आज भाजपा राजवटीत ओबीसींना हा अधिकार बहाल केला गेला आहे. शेतीवर 80 टक्के ओबीसी आहे. मोदींनी कृषी मालाचे भाव दुप्पट केले. कारागीरांना विश्वकर्मा योजनेतून बळ दिला. कौशल्य विकासातून रोजगार निर्मीती केली. स्वदेशी उत्पादनास बळ दिले. यात ओबीसींचा मोठा वाटा राहणार आहे. त्यामुळे ओबीसींचे हित कोणत्या पक्षात आहे याचा विचार ओबीसी बांधवांनी करण्याची गरज असल्याचे हंसराज अहीर म्हणाले.



# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत राजीव गांधी व सद्‌गुरू जनेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव दिनांक 05/10/2023 रोजी झालेल्या मैदानी स्पर्धेत राजीव गांधी कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय घोडेगावमधील दळे सोनाली भाऊसाहेब हीने मुलींच्या 19 वयोगट 1500 मीटर धावणे मधुन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. रेहान अनिस बेग या विद्यार्थ्याने 17वयोगट मधून 100 मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. 200 मीटर धावणे स्पर्धेत सुद्धा रेहान अनिस बेग या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकाविला व भालाफेक स्पर्धेत सुद्धा प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. तर सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालयातून 800 मीटर धावणे स्पर्धेत पूजा काळे हीने प्रथम क्रमांक मिळवला. तर रीले स्पर्धेतून 14 वयोगटातून मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री साईनाथ पाटील जाधव, प्रशासकीय अधिकारी संदीप सर कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रिडाशिक्षक श्री जाधव टी. एल. सर शाळेचे क्रिडाशिक्षक श्री. वाकळे एस बी सर प्राचार्य, मुख्याध्यापक शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# रामचंद्र म्हात्रे विद्यालयात ध्यानधारणा कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परम पूज्य श्रीमाताजी निर्मलादेवी प्रणित सहजयोगाच्या माध्यमातून ध्यान धारणेची कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी सहजयोग विषयातील तज्ञ मार्गदर्शक ठोंबरे सर, रमाशंकर चौरसिया सर, भूषण काळे, कविता वळवे, अश्विनी काळे यांनी ध्यान धारणेचे महत्त्व विशद केले आणि कुंडलिनी शक्ति जागृत करण्यात आली. ध्यान धारणेच्या माध्यमातून स्मरण शक्तीचा विकास होतो. अभ्यासात प्रगती होते, मनःशांती आणि आनंद मिळतो. सहजयोग केल्याने होणाऱ्या फायद्यांविषयी यावेळी माहिती देण्यात आली. ही संपूर्ण शास्त्रोक्त पद्धत आहे. यावेळी नेरूळ, कोपरखैरणे आणि पनवेल येथील ज्येष्ठ सहजयोगी जयराम मुकादम, बाबुराव रनावरे, राजेंद्र अहिरराव, जयश्री नाईक, वसंत कडू, अतुल मिसाळ, रामचंद्र येवले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. जगभरातील 140 देशांमध्ये सहजयोग केला जातो. कार्यशाळेत उपस्थित असलेल्या 700 विद्यार्थ्यांकरिता चार सत्र घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याधर गावंड यांनी केले तर आभार प्रदर्शन नंदलाल पाटील यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य सुभाष ठाकूर, नितेश गावंड, संगीता म्हात्रे, निवास गावंड, हिमांशू पटेल, रमेश शेवाळे, व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



# कोणतेही काम अशक्य मुळीच नसते; त्यासाठी जिद्द, सातत्य, ध्येय असावे लागते : डॉ. खंडाईत

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** बिहारच्या दशरथ मांझी यांनी सातत्याने बावीस वर्षे कुदळ,फावडे घेऊन एकट्याने संपूर्ण डोंगर फोडून पंचावन्न किलोमीटरचा रस्ता केला की, जो डोंगराला वळसा घालून जात होता, तो केवळ बावीस किलो मीटरवर आणून चमत्कार घडवून आणला. कोणतेही काम अशक्य मुळीच नसते. त्यासाठी जिद्द, उमेद, सातत्य, निष्ठा आणि ध्येय असावे लागते, असे प्रतिपादन डॉ.विलास खंडाईत यांनी केले.ते ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज खंडाळा बावडा येथे इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रोत्साहनपर व्याख्यान कार्यक्रमातून बोलत होते.यावेळी विचारपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात,सचिव स्नेहल खरात उपस्थित होते. डॉ.विलास खंडाईत पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेतले.असामान्य कामगिरी करून देशांमध्ये किमया घडवली.उच्चशिक्षण घेऊन या देशाची राज्यघटना लिहून सर्व भारतीयांना समान हक्क मिळवून दिले. संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात यांनी आभार प्रदर्शन करताना म्हटले की, भारताची प्रसिद्ध भारोत्तोलन खेळाडू मीराबाई चानू हिने देखील परिस्थितीवर मात करून चाळीस किलोमीटर अंतरावरील इंफाळ येथे,रोज प्रसंगी धावत जाऊन रोजचा सराव सातत्याने चालू ठेवून देशासाठी सुवर्णपदक पटकावले.डॉ.नरेंद्र जाधव लिखित आमचा बाप आणि आम्ही या पुस्तकामधील काही वैशिष्ट्ये सुद्धा जयकुमार खरात यांनी सांगितली. संस्थेच्या जडण घडणीत संस्थेचे अध्यक्ष गौतम भोसले, उपाध्यक्ष जयकुमार खरात, सचिव स्नेहल खरात, प्राचार्या सुदर्शना जाधव यांनी देखील खडतर प्रवास करत ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज हे संकुल उभारण्याची किमया साधली आहे. डॉ.विलास खंडाईत यांनी प्रभावी पणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याने अशी प्रोत्साहन पर व्याख्याने शाळेत वारंवार व्हायला हवीत, अशी अपेक्षा सुद्धा विद्यार्थी यांच्याकडून व्यक्त केली जात आहे.






# नांदेड येथील घटनेचे तीव्र पडसाद

## चंद्रपुरात डॉक्टरांचा काळी फीत लावून कँडल मार्च

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड येथील अधिष्ठाता डॉक्टर वाकोडे यांना खासदार हेमंत पाटील यांनी महाविद्यालयातील प्रसाधनगृह स्वच्छ करायला लावल्याने राज्यातील डॉक्टर संतापले आहे. याचे पडसाद चंद्रपूर मधेही उमटले असून चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांनी बुधवारी सायंकाळी मुख्य मार्गाने कॅन्डल मार्च काढत काळी फित लावून खा. पाटील यांचा निषेध नोंदविला. नांदेड शासकीय वैद्यकीय रुग्णालयात मृत्यूच्या तांडवानंतर खासदार हेमंत पाटील यांनी डिन एस. आर. वाकोडे यांना स्वच्छतागृह स्वच्छ करायला लावले, यावेळी पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी व्हिडीओ तयार करून तो व्हायरल सुद्धा केला. या घटनेमुळे डॉक्टर संघटना खासदार पाटील यांच्या विरोधात आक्रमक झाल्या आहेत. चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेच्या वतीने काळी फित लावत कॅन्डल मार्च काढून नांदेड येथील घटनेचा निषेध नोंदवला. खासदार पाटील यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी यावेळी डॉक्टरांनी केली. यावेळी संघटनेच्या अध्यक्ष डॉ. तेजस्विनी चौधरी, रोहित होरे, प्रशांत मगदूम, ऋतुजा गांगुर्डे, रोहीत नायकवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने डॉक्टरांची उपस्थिती होती.

# पळसगाव ये-जासाठी रस्ता नाही, नागरिकांचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे पळसगाव गावांतून भारतीय राष्ट्रीय मार्ग गेला परंतु प्रशासन तथा विभागाने ये जा गावांसाठी सर्व्हिस रोड न केल्याने गावात तथा शेता लगत ये जा साठी हाल होत आहेत या संदर्भात विभाग व प्रशासनाला वेळोवेळी लोकशाही मार्गाने तक्रार निवेदन रस्ता रोको केले परंतु विभाग तथा प्रशासन याची दखल घेत नाही यासाठी कार्यालय समोरच उपोषण सुरू केले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालयाच्या समोर पळसवाडी येथील उपसरपंच सोमनाथ ठेंगडे यांच्या नेतृत्वात गावातील माजी उपसभापती प.स. युवराज पाटील सरपंच दगडु भेंडे शेतकरी शेत मजूर पंचायत जिल्हा अध्यक्ष कासमभाई माजी उप सरपंच सुधाकर दहीवाळ ग्रां प. सदस्य सीताराम पवार आम आदमी युवा अध्यक्ष किशोर जाधव यांच्या सह गावातील नागरिक प्रमुख मागणी राष्ट्रीय महा मार्ग 52 वरील पळसवाडी गावातून गेला असून गावात येण्या जाण्या करिता सर्व्हिस रोड न केल्याने गावातून बाहेर गावी किंवा शेती कामा जाण्यास रस्ता नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून जन जीवन ठप झाले आहे त्या करिता ग्रामपंचायत व गावकरी यांनी वेळोवेळी निवेदने दिली रस्ता रोको केले तरी विभाग व प्रशासन दखल घेत नाही की कोणतीही अडचण दूर करण्यासाठी तयार नसल्याने गावकऱ्यांनी उपोषणचा मार्ग पत्करला आहे.






# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत विद्यार्थ्यांचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी दि.05 रोजी मैदानी स्पर्धा अल इरफान स्कूल खुलताबाद या ठिकाणी घेण्यात आल्या मैदानी खेळांमध्ये प्रथम व द्वितीय व तृतीय विद्यार्थी आलेले खालील प्रमाणे आहे. 100 मीटर धावणे 19 वयोगट प्रथम हिना शेख व द्वितीय सिद्धांत राठोड, 200 मीटर धावणे 19 वयोगट. प्रथम अनुराग जाधव व तृतीय कोमल पल्हाळ. 800 मीटर धावणे 19 वयोगट. प्रथम सोनाली सुनील नलावडे, व द्वितीय अनुराग जाधव व तृतीय प्रीती बाळू काळे. 1500 मीटर धावणे 19 वयोगट. द्वितीय मुस्तकीम पटेल पटेल व द्वितीय संजना वाघ. 3. किलोमीटर धावणे 17 वयोगट. प्रथम मुक्ता कामटे. 3. किलोमीटर धावणे 19 वयोगट प्रथम कोमल पल्हाळ व ऋषिकेश बहुले. 3. किलोमीटर चालणे वयोगट 19 प्रथम नम्रता अहेवाड.3. किलोमीटर चालणे वयोगट 17 रोहिणी जंजाळे प्रथम व द्वितीय साक्षी नलावडे. पाच किलोमीटर चालणे वयोगट 17 दुतीय गौरव मुळे. गोळा फेक वयोगट 19 प्रथम संजना वाघ द्वितीय प्रीती साबळे. लांब उडी वयोगट 19 ऋतुजा चव्हाण प्रथम. वयोगट 17 तृतीय अर्जुन राठोड. उंच उडी वयोगट 17 प्रथम अर्जुन राठोड. प्रथम मुक्ता कामटे व द्वितीय गीता बोडखे . उंच उडी वयोगट 19 प्रथम सिद्धांत राठोड व द्वितीय आदेश शेजुळ. थाळीफेक 19 वयोगट तृतीय आदेश शेजुळ. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी महाविद्यालय तर्फे शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी संस्थाध्यक्ष विजयजी दारकुंडे सर व सचिव भाऊसाहेब जी काळे सर व प्राचार्य व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आम आदमी पार्टीच्या वतीने खासदार संजय सिंग यांच्या अटकेविरोधात निदर्शने

## जब जब मोदी डरता हैं - ईडी आगे करता हैं

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय नेते राज्यसभेचे खासदार संजय सिंग यांना केंद्र सरकारने अटक केली आहे. खासदार संजय सिंग यांच्या अटकेच्या कारवाई विरोधात केंद्र सरकारच्या निषेधार्थ गुरुवारी दुपारी 4 वाजेच्या सुमारास आम आदमी पार्टी छत्रपती संभाजीनगर च्या वतीनेन जिल्हाध्यक्ष सुभाष निकम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी जोरदार निदर्शने करण्यात आली.मोदी सरकार हाय हाय, पुलिस के दम पे गुंडागर्दी, नही चलेगी नही चलेगी, जब जब मोदी डरता है-इडी आगे करता है. अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. (खा. संजय सिंग यांच्या विरोधात राजकीय सूडबुद्धीने कार्यवाही केंद्रातील मोदी सरकार हे आम आदमी पक्षाला घाबरलेले आहे. आम आदमी पार्टी ही कट्टर इमानदार पार्टी आहे. पक्षाचे नेते मनीष सिसोदिया, सतेंद्र जैन हे अनेक वर्षांपासून याच द्वेशापाई पायी जेलमध्ये आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांना एक छदामही भ्रष्टाचार उघडकीस आणता आला नाही. तसेच आम आदमी पार्टीच्या विरोधात हजार पेक्षा जास्त छापे मारूनही त्यांच्या हाती काहीही लागलेलं नाही. केवळ राजकीय सूडबुद्धीने मोदी सरकारने घाबरून पक्षाचे नेते खा संजय सिंग यांच्या विरोधात अटकेची कारवाई केली आहे. आताही त्यांना काहीच मिळणार नाही. पुढील काळात आम आदमी पक्षाच्या वतीने आणखी तीव्र आंदोलन करू असे युवा जिल्हाध्यक्ष सतीश देवेंद्र लोखंडे,छत्रपती संभाजीनगर.यांनी यावेळी सांगितले यावेळी मराठवाडा सचिव वैजनाथ राठोड, मराठवाडा संघटनमंत्री सुग्रीव मुंडे, जिल्हा सचिव दत्तू पवार, संघटन मंत्री, संजय चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष जालिंदर ढाकणे, शहर अध्यक्ष इम्रान उस्मान शेख, अतुल निकम, युवा जिल्हाध्यक्ष सतीश देवेंद्र लोखंडे, शहर उपाध्यक्ष मधुकर माघाडे, सह सचिव अंकुश मोकासे,महिला जिल्हाध्यक्ष मेघा राईकवार, महिला शहराध्यक्ष ज्योती जाधव, सलीम पटेल, सल्लाहुद्दीन न, अझहर खान, गोरखसिंग जारवाल, ज्ञानेश्वर बोरसे, मजाज खान, अमोल भालेराव, पांडुरंग खोतकर, आशा सावळे, खाजा किस्मतवाला, अंसार शेख यांच्यासह मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थिती होती.



# पिंपळगाव वळण येथे इंदुरीकर यांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यामध्ये आदर्श माध्यमिक शाळा येथे 07/10/2023 शनिवार रोजी सां. 8:00 ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर समाजप्रबोधनकार यांचे जाहीर कीर्तन सोहळा श्री किशोर (नाना) बलांडे जि.प. सभापती व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक फुलंब्री यांच्या वाढदिवसाच्या निमित्त ठेवण्यात आले असून संयोजक योगेश काशिनाथ जाधव कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक फुलंब्री किशोर नाना बलांडे व मित्र मंडळ यांनी जास्तीत जास्त नागरिकांना हजर राहण्याची विनंती केली असून स्थळ आदर्श माध्यमिक शाळा मतेवाडी फाटा पिंपळगाव वळण ता. फुलंब्री जि. संभाजीनगर

# स्पर्धा परीक्षेचं पुस्तक वाचणाऱ्या ८३ वर्षीय बबई बनसोडेंकडून विविध पुस्तकांचे वाचन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मोकळ्या वेळात नुसतं घरी बसून करायचं काय? म्हणून एक ८३ वर्षीय आजीबाई पुस्तके हातात घेते, एक पुस्तक वाचून झालं की दुसरे पुस्तक वाचायला घेते, असे एक एक पुस्तक घेऊन आजीबाईंनी ५० हून अधिक पुस्तके वाचण्याची किमया केलेली आहे. ह्या वयात डोळ्यांना कोणताही चष्मा न लावता पुस्तकातील अक्षरे अगदी स्पष्टपणे वाचत असते. डोळ्यांना कोणताही त्रास न होता, वाचनाची गोडी अवगत केलेल्या आजीबाई वाचनात चांगल्याच रममाण झालेल्या आहेत. बबई केरबा बनसोडे असे या आजीबाईंचे नांव असून त्या पुणे जिल्ह्यातील निंबुत ता.बारामती येथील रहिवासी आहेत.या वयात सुद्धा पुस्तक वाचन करण्याचा त्यांनी छंद जोपासलेला आहे. अनेक कथा, कादंबऱ्या तसेच महापुरुषांच्या जीवनचरित्रावरील आधारित विविध पुस्तके त्यांच्या वाचनात आलेली आहेत.जे पुस्तक वाचण्यास उपलब्ध होईल, ते पुस्तक त्या पूर्णपणे वाचण्याचा प्रयत्न करत असतात.गेल्याच महिन्यात आजीबाईंनी चक्क नातवाचेच स्पर्धा परीक्षेचे पुस्तक वाचण्यास घेतले. अन ते पुस्तक पूर्णपणे वाचले सुद्धा...
या पुस्तकाबद्दल सांगत असताना बबई बनसोडे म्हणाल्या की, घरात एक भलं मोठं पुस्तक दिसून आलं. ते पुस्तक हातात घेऊन वाचण्यास सुरुवात केली. हे पुस्तक वाचत असताना पुस्तकात अधून मधून इंग्रजी सुद्धा दिसून येत होतं. ते इंग्रजी कळत नसल्याने इंग्रजी वगळून मराठी मध्ये असलेले सर्व काही वाचलेलं आहे, असे त्यांनी म्हटले.
अधिकारी होण्याचं स्वप्न बाळगलेली मुलं-मुली जी स्पर्धा परीक्षेची पुस्तके हाती घेत असतात.तेच पुस्तक आजीबाईनी हातात घेतल्याने आजीबाईंना



सुद्धा आपण अधिकारीच व्हावंसं वाटलं असेल. तुम्ही सुद्धा आता अधिकारी होणार असं आजीबाईंना म्हणताच क्षणी आजीबाईंच्या चेहऱ्यावर स्मित हसू येऊन गेलं. आजीबाई यांना वाचनाची चांगली गोडी लागलेली असून त्यांच्या कुटूंबियांना सुद्धा हे वाचन कौशल्य कौतूकाची बाब वाटत आहे. मुलं,नातवंडे,संपूर्ण परिवार कुटूंब सुद्धा मोठ्या कुतुहलाने या वाचनाबद्दल आजीबाईंचे कौतुक करत असतात.हल्ली वाचन संस्कृती हरवत चाललेली असून पुस्तक वाचन करणारा वर्ग गायब झालेला आहे.जुनी ७ वी एवढे शिक्षण घेतलेल्या या आजीबाई मात्र आजच्या काळात सुद्धा पुस्तक वाचताना पाहायला मिळतात. दिवस भरातील मोकळा वेळ कसा घालवायचा म्हणून आजीबाई त्यांचा मोकळा वेळ पुस्तक वाचनाला देत असल्याने ही वेळ घालविण्याची पद्धत लोकांना नक्कीच प्रेरित करणारी आहे. आजीबाईंचं पुस्तक वाचनं हे अनेकांना हातात पुस्तक घ्यायची मानसिकता तयारी करणारी आहे, असे म्हणावे लागेल.
आजीबाईंनी आतापर्यंत कोण कोणती पुस्तके वाचली. याबाबत सुद्धा त्या पुस्तकांची नावे पटकन सांगत असतात. आजीबाईंनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म,महाडचा सत्याग्रह, संत चोखामेळा, श्यामची आई,प्र काश आमटे, आमचा बाप आणि आम्ही, उपरा, सिंधुताई सपकाळ,प्र काश आमटे, वाटचाल, लोक माझा सांगाती, मानवतेची कणव, तसेच सुधा मूर्ती यांची पाच पुस्तके यांसारखी अनेक पुस्तके त्यांनी वाचलेली आहेत. पुस्तकात जे वाचलं ते त्या सांगण्याचा प्रयत्न ही करत असतात. एखादी वाचलेली कथा स्वतःच्या भाषेत समजून सांगत असताना आजीबाईंची सजग,जागृत व कुशाग्र अशीच बुध्दीमत्ता पाहायला मिळते.सद्यस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी हे नानक चंद रतू यांचे भास्कर लक्ष्मण भोळे यांनी भाषांतर केलेले पुस्तक बबई बनसोडे वाचत असून पुढील वाचन करण्यासाठी व.पू.काळे यांचे दोस्त नावाचे पुस्तक, अनिल अवचट यांचे मुक्तांगणाची गोष्ट,डॉ.रमेश जाधव यांचे लोकराजा शाहू छत्रपती,श्रुती तांबे यांचे पुरोगामित्व म्हणजे काय? ही पुस्तके घरात आणुन ठेवण्यात आलेली आहेत.

# गोवा येथे सोमवारी बृहन्महाराष्ट्र समूहाचा वर्धापन दिन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** चार वर्षापूर्वी लेखक आणि पत्रकार प्रशांत गौतम यांनी छत्रपती संभाजीनगर येथून सुरु केलेल्या बृहन्महाराष्ट्र मित्र समुहाचा तिसरा वर्धापन दिन दि.10ऑक्टोंबर रोजी पणजी(गोवा) येथे होणार आहे,त्या निमित्त गदिमांच्या कवितेवर व्याख्यान,स्थानिक कवींचे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.अशी माहिती साहित्य लेणी प्रतिष्ठान ताळगाव,च्या अध्यक्ष व समुहाच्या सह प्रशासक चित्रा क्षीरसागर, कार्यक्रम संयोजक प्रकाश क्षीरसागर यांनी दिली. बृहन्महाराष्ट्र मित्र समुह व साहित्य लेणी प्रतिष्ठान (ताळगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवशीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.गोमंतक साहित्य सेवक मंडळाच्या सभागृहात दुपारी तीन वाजता कार्यक्रमाचे उद्घाटन लोकप्रिय गोमंतकीय कवयत्री डॉ.अनुजा जोशी करणार असुन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गोवा राज्याचे लोकायुक्त माजी न्यायमूर्ती अंबादास जोशी भूषवणार आहेत. या वेळी मुंबई येथील सुप्रसिध्द निवेदिका सुकन्या जोशी यांचे गदिमांच्या कवितेतील शब्द सौंदर्य या विषयावर व्याख्यान होणार आहे .या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.स्नेहा महांबरे(पणजी),बृहन्महाराष्ट्र मित्र समुहाचे मुख्य प्रशासक प्रशांत गौतम,नारायण पांडव (माजी प्रबंधक युनियन बँक ऑफ इंडिया,छत्रपती नगर) उद्घाटन समारंभानंतर दुपारी चार वाजता काव्यांजली ही निमंत्रित कवींची मैफल सुकन्या जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. स्नेहमेळावा व कवी संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी व शास्त्रीजींना उपजिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त येथील उपजिल्हा-धिकारी कार्यालयात सकाळी दहा वाजता उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, जेष्ठ नागरिक डॉ. एस, एम, जोशी, काशीनाथ शेठ गायकवाड, स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत, गोविंद दाभाडे, काशिनाथ भावसार, माजी नगरसेवक दशरथ बनकर, सखाहरी बर्डे, स्वप्नील जेजुरकर, प्रकाश माळी, रमेश भालेराव, महेश शिंदे, मंडळ अधिकारी जितेंद्र चापानेरकर, सुरेश धुमाळ, शिवलिंग आप्पा साखरे, बाबासाहेब धुमाळ, शेख, मकरंद कुलकर्णी, अमोल राजपूत, श्रीमती वाघ, स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, विष्णू आलूले, रमेश त्रिभुवन, चेतन निखाडे यांच्या सह शहरातील नागरिकांनी एकत्र जमून प्रथम परिसर स्वच्छता केली.

तसेच पालिका स्वच्छता विभागातील सफाई कामगार महिला व पुरुषांचा उपजिल्हाधिकारी डॉ,जऱ्हाड यांनी गुलाब पुष्प व शाल देऊन सत्कार केला. स्वच्छता हीच सेवा"व स्वच्छता बाबत माहिती देऊन तालुका तंबाखू नियंत्रण समितीचे सदस्य धोंडीराम राजपूत यांनी "राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम"अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त उपस्थितीना तंबाखू मुक्तीची शपथ दिली. उपजिल्हारुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ.गजानन टारपे व राजपूत यानी गांधी व शास्त्री जिना अभिवादन केले.

# राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन संस्थेमध्ये स्वच्छता पंधरवडा दिमाखात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** खारघर येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई संस्थेमध्ये दिनांक १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या दरम्यान स्वच्छता पंधरवडा दिमाखात साजरा केला गेला. या स्वछता पंधरवड्यामध्ये विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जसे कोविड १९ सबंधीत स्वच्छता, कीटकनाशके फवारणी, संस्थेमधील स्वच्छता, तसेच संस्थेच्या परिसरातील, स्वच्छता यावर विविध उपक्रम राबविण्यात आले. तसेच १ व २ ऑक्टोबर या दिवशी खारघर सेक्टर ५ या परिसरातील स्वच्छता करण्यात आली. यामध्ये संस्थेचे सर्व बौद्धीक दिव्यांग मुले, पालक, प्रशिक्षणार्थी, सर्व व्याख्यता, कर्मचारी आणी संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह सर सहभागी होते. याव्यतिरिक्त वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे सुद्धा स्वच्छते सबंधीत माहिती बौद्धीक दिव्यांग मुले व प्रशिक्षणार्थी द्वारे सादर करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. तसेच या कार्यक्रमामध्ये संस्थेतील व्याख्यता वर्ग,कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या प्रत्येक दिवसाच्या स्वच्छते सबंधित कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती गायत्री कवडे विशेष शिक्षक यांनी केले. यांना श्रीमती शर्मिश्ठा घोष व श्रीमती करुणा मस्के, संतोष शेलार सुरेश बेडके आणि महादेव माने विशेष शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.





# ज्येष्ठ व्यक्तींच्या विचारांचा स्वीकार करा

## ह.भ.प. प्रशांत महाराज खानापूरकर

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करून श्रेष्ठ विचारांचा स्वीकार करा आपले जीवन सुखकर आणि समृद्ध बनल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन भागवताचार्य प्रशांत महाराज चव्हाण खानापूरकर यांनी येथील विष्णुदास ह.भ.प.नामदेव महाराज ढवळे यांच्या मातृ पितृ आणि घुले बाबा आळंदी यांच्या पुण्यतिथी निमित्ताचे दि.५गुरुवार ते दि. ९सोमवार या दरम्यान सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील पहिल्या दिवसाचे कीर्तन श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण केले. भागवताचार्य व रामनाचार्य बापूसाहेब महाराज खवणे, भागवताचार्य प्रसाद काष्टे, गुणाजी महाराज खैरमोडे, युवा कीर्तनकार, गाण कोकीळा, युवा कीर्तनकार ह.भ.प. माऊली खवणे, पंजाबराव महाराज काळे हलविरा, अजय महाराज गाडेकर, रामप्रसाद बादाड, मन्मथ खके, बापुराव महाराज जाधव, ह.भ.प.सचिन महाराज लंबे,दत्तराव दौंड,सुभाष राऊत, नामदेव राऊत, अशोक बोकन, जगदीश देशमुख, छत्रगुण जगताप, दत्ता महाराज उगले,आदींच प्रमुख उपस्थिती होती.

महाराजे पुढे म्हणाले की आज ज्येष्ठांचा अपमान करणारे आणि ज्येष्ठ व्यक्तींना पदोपदी दुखवणारी अनेक लोक या समाजात जन्माला आलेले आहेत. मात्र ज्येष्ठ लोकांनी आपल्यासाठी काय काय केले समाजासाठी मोठे योगदान दिले याचा विचार कोणीही करत नाही. आज घराघरातल्या आई-वडिलांची वयोवृद्ध लोकांची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. आई-वडिलांना सांभाळणे आणि त्यांचा सन्मान करणे आवश्यक आहे. यासाठी समाजाला संस्कारीत करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान केला आणि चांगले विचार यांचा स्वीकार जर केला तर आपल्या जीवनाचा सर्वांगीण विकास होतो. आपले जीवन समृद्ध बनते. समाजाचे हित होते. यासाठी प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या मंडळींचा मग ते आई-वडील असो आजी आजोबा असो किंवा वयाने मोठे असणाऱ्या व्यक्तींचा नक्कीच सन्मान आपण केला पाहिजे. समाजामध्ये असणाऱ्या वाईट विचारांचा त्याग करून श्रेष्ठ आणि सद विचारांचा स्वीकार केला तर एक आदर्श पिढी समाजामध्ये निर्माण होईल आणि हा समाज निर्माण करण्यासाठी कीर्तनातून संत विचार समाजाला सांगणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक सामाजिक विषयावर प्रबोधन केले.कार्यक्रमाला श्री संत विष्णुदास नामदेव महाराज ढवळे यांच्यासह चारठाणा पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्त, वारकरी शिक्षण संस्थेतील आजी माजी विद्यार्थ्यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर